शुक्रवारी (दि. १०) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात आयोजिलेल्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमामध्ये कायनेटीक इंजिनिअरिंग लिमिटेडचे संचालक अरुण फिरोदिया, कुलगुरु डॉ. वासुदेव गाडे यांच्या हस्ते ३ लाख रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन महाविद्यालयास गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अरहंतदास शहा, सचिव जवाहर शहा, मिलिंद शहा, विकास शहा, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य एम. के. कोकरे, डॉ. शिवाजी साठे, डॉ. रंजना नेमाडे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

याचवेळी विद्यापीठातर्फे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनाही 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.



पुणे विद्यापीठातर्फे उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाला गौरविण्यात आले.

# शिक्षणव्यवस्थेचा दर्जा वाढविण्याची गरज

## विजय भटकर : शिक्षणात गुणवत्ता नाही

**गडचिरोली :** परिवर्तनासाठी वैद्यकीय,



अभियांत्रिकी, संगीत, नृत्य आदीसह विविध शाखा विद्यापीठात असणे आवश्यक आहे. भारतीय शिक्षणात उच्चकोटीचा गुणवत्ता नाही. मात्र हे शिक्षण संस्कृतीला धरुन असल्याने महत्त्व फार मोठे आहे. हे ध्यानी घेता शिक्षणव्यवस्थेचा दर्जा वाढविणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन संगणकतज्ज्ञ व नालंदा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विजय भटकर यांनी केले.

स्थानिक गोंडवाना विद्यापीठाचा चतुर्थ दीक्षांत समारंभ सोमवारी पार पडला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. एन. व्ही. कल्याणकर तर, विशेष अतिथी म्हणून मेघालयचे माजी राज्यपाल व सेवानिवृत्त सनदी अधिकारी रणजित मुशाहरी उपस्थित होते. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, अर्थव्यवस्थेसह साऱ्याच क्षेत्रात भारत आता प्रगती करीत आहे. आजघडीस जगातील दुसऱ्या क्रमांकाची शिक्षणव्यवस्था आणि तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था भारतात आहे, असे सांगून डॉ. भटकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी अगोदर संस्कृतीचा अभ्यास केला पाहिजे, अन्यथा मिळविलेले सर्व ज्ञान निरर्थक ठरते.

रणजित मुशाहरी म्हणाले, मानवाला प्रगतीसाठी शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे. ज्ञानप्राप्तीनेच सर्व क्षेत्रातील विकासांची दारे खुली होतात. (स्थानिक प्रतिनिधी)

मा.प्राचार्य साहेब



# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय, मा.डॉ. मुरूमकर यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्रदान




बारामती - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ करीता अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास, उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्रदान केला. दि. १० फेब्रुवारी २०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात आयोजिलेल्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे मा.श्री. अरूण फिरोदिया, संचालक, कायनेटिक इंजिनीअरींग लिमिटेड व मा.डॉ. वासुदेव गाडे, कुलगुरू यांचे हस्ते रक्कम रूपये ३ लाख व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून महाविद्यालयास गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. अरहतदास हिराचंद शहा सराफ, सचिव जवाहर मोतीलाल शहा, मा.श्री. मिलिंद शहा, मा.श्री. विकास शहा, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य एम.के. कोकरे, डॉ. शिवाजी साठे, डॉ. रंजना नेमाडे, आय.क्यू.ए.सी. सदस्य व विविध उपक्रमांचे प्रमुख, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संस्था व महाविद्यालयाच्या इतिहासातील हा अविस्मरणीय क्षण होता. याचवेळी विद्यापीठातर्फे महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनाही उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. या महाविद्यालयामध्ये सध्या जवळपास १०००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इथे पदवीस्तरावर २५, पदव्युत्तर स्तरावर १८ विषयांचे अध्यापन केले जाते. बी.व्होकेशनल या व्यावसायिक अभ्यासक्रमांर्गत फूड प्रोसेसिंग अँड पोस्ट हार्वेस्ट टेक्नोलॉजी व जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन हे अभ्यासक्रम गेली दोन वर्षापासून नव्याने सुरू करण्यात आले आहेत. महाविद्यालयात शैक्षणिक उपक्रमांबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना, कविवर्य भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, अनेक विद्यार्थीभिमूख उपक्रम राबविले जातात. विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रे आणि कार्यशाळांचे यशस्वीरित्या आयोजन करून महाविद्यालयाने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. महाविद्यालयास नुकताच युजीसी कडून सीपीई हा दर्जा, डीबीटी तर्फे स्टार कॉलेज स्कीम हा दर्जा तसेच डीएसटी फिस्ट यासारख्या योजनांमधून देखील अनुदान प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयएसओ ९००१-२००८ मानांकन महाविद्यालयाने मिळविलेले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. चंद्रशेखर मुरूमकर हे गेल्या ३० वर्षापासून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये अध्यापन करत आहेत. तर गेल्या ९ वर्षापासून ते महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. वनस्पतीशास्त्र या विषयात त्यांचे ६० हून अधिक संशोधन लेखन अनेक ख्यातनाम राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून प्रसिद्ध झाले आहेत. अकॅडेमि ऑफ प्लँट सायन्सेस, इंडिया (एपीएसआय) या संस्थेतर्फे आंतरराष्ट्रीय प्लँट सायंटीस्ट पुरस्कार देखील त्यांना प्राप्त झाला आहे. महाविद्यालयामध्ये प्रथमच बॉटनी या विषयाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे त्यांनी आयोजन केले होते. या परिषदेमध्ये संपूर्ण भारतातून व परदेशातून अनेक ख्यातनाम शास्त्रज्ञ, तज्ञ संशोधक या परिषदेमध्ये सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे बालभारतीच्या शास्त्र समितीच्या अध्यक्षपदी कार्यरत राहून प्राथमिक, माध्यमिक स्तरावरून विविध शैक्षणिक बदल, नवनवीन संकल्पना, विविध योजना इ. द्वारे शैक्षणिक क्षेत्रामध्ये विकासाचे परिवर्तन ते करीत आहेत. डॉ. मुरूमकर यांचे आज अनेक विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत. महाविद्यालयास प्राप्त झालेल्या या भरीव यशाबद्दल संस्थेचे मा.श्री. अरहतदास हिराचंद शहा (सराफ), सचिव श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर), मा.श्री. सुनील शिवलाल शहा (लेंगरेकर), मा.श्री. मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर), मा.श्री. विकास शशिकांत शहा (लेंगरेकर), मा.डॉ. राजेंद्र माणिकलाल मुथा, मा.श्री. करण शाह (वाघोलीकर), मा.डॉ. राजकुमार छाजेड व संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी मा.प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य प्रा. एम.के. कोकरे, डॉ. शिवाजी साठे, डॉ. रंजना नेमाडे, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांचे कौतुक करून विशेष हार्दिक अभिनंदन केले.

HERO electric

सकाळ दि 25/2/18 पान 4

## बारामती सकाळ कार्यालयाच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा !

।। सिध्दिरनेकान्तात् ।।

# अनेकान्त एज्युकेशन सोसायटी बारामती

*** सचिव ***
मा.श्री.जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर)

*** अध्यक्ष ***
मा.श्री. अरहतदास हिराचंद शहा (सराफ)

*** खजिनदार ***
मा.श्री. सुनिल शिवलाल शहा (लेंगरेकर)

## * नियामक मंडळ सदस्य *

| | | | |
|---|---|---|---|
| मा.श्री. राजकुमार तुळजाराम शाह (वाघोलीकर) | मा.श्री. सुभाष माणिकलाल शाह (वाघोलीकर) | मा.श्री. चकोर नलिनचंद्र गांधी | मा.श्री. मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर) |
| मा.श्री. विकास शशिकांत शहा (लेंगरेकर) | मा.श्री. चंद्रवदन विद्याचंद्र शहा (मुंबईकर) | मा.डॉ.श्री. सुभाष बाबुराव अडदंडे | मा.श्री. पद्माकार पायगोंडा पाटील |
| मा.डॉ.श्री. महावीर रायाप्पा अकोळे | मा.डॉ.श्री. धवलकुमार शामगोंडा पाटील | मा.श्री. अशोक सुरेंद्र शिरगुप्पे | मा.श्री. जिनेश्वर भाऊ दत्तवाडे |

* सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी *

Tuljaram Chaturchand College Library Baramati

08 प्रभात पुणे, मंगळवार, दि. २८ फेब्रुवारी २०१७

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास ए प्लस ग्रेड

बारामती, दि. २७ (प्रतिनिधी) - राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद, (बेंगलोर यांनी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयांस एप्लसग्रेड जाहीर केली. यामध्ये महाविद्यालयास सीजीपीए ३.५५ गुण प्राप्त झाले. महाविद्यालयाच्या इतिहासातील एक देदीप्यमान प्रगती आहे. या यशाने महाविद्यालयाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. निश्चितच तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या दर्जाचा आलेख यामुळे उंचावला आहे. संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाची घोडदौड सुरु आहे.

महाविद्यालयास दुसऱ्या फेरीत बी प्लस सिजीपीए २.९२ श्रेणी मिळाली होती. महाविद्यालयास उच्च श्रेणी प्राप्त होण्याकरिता महाविद्यालयातील सर्व विभागांनी संशोधन, अध्यापन, अध्ययनाचा दर्जा उंचावण्यासाठी विशेष मेहनत घेतली. नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास 'उत्कृष्ट महाविद्यालय' तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनाही 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' प्राप्त झाला आहे. महाविद्यालयामध्ये जवळपास १० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इथे पदवीस्तरावर २५ व पदव्युत्तर स्तरावर १८ विषयांचे अध्यापन केले जाते. महाविद्यालयात शैक्षणिक उपक्रमाबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना, कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वाद व वक्तृत्व स्पर्धा, कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, अनेक विद्यार्थीभिमुख उपक्रम राबविले जातात. विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रे आणि कार्यशाळांचे यशस्वीरित्या आयोजन करून महाविद्यालयाने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. महाविद्यालयास नुकताच युजीसीकडून 'सीपीई' हा दर्जा, डीबीटी तर्फे स्टार कॉलेज स्कीम तसेच डीएसटी फिस्ट यासारख्या योजनांमधून देखील अनुदान प्राप्त झाले आहे.

Tuljaram Chaturchand College * Baramati
Library

लोकमत पुणे, मंगळवार, दि. २८ फेब्रुवारी २०१७ २

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास 'ए प्लस 'श्रेणी

बारामती : राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद, बेंगलोरच्या वतीने येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास 'ए प्लस'श्रेणी जाहीर केली. यामध्ये महाविद्यालयास सीजीपीए ३.५५ गुण प्राप्त झाले. या यशाने महाविद्यालयाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी याबाबत अधिक माहिती दिली. डॉ. मुरुमकर यांनी सांगितले की, महाविद्यालयास दुसऱ्या फेरीत बी + सीजीपीए २.९२ श्रेणी मिळाली होती. महाविद्यालयास उच्चश्रेणी प्राप्त होण्याकरिता महाविद्यालयातील सर्व विभागांनी विशेष मेहनत घेतली. नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ मध्ये महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय, तर प्राचार्यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्राप्त झाला आहे.



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर आणि अन्य समितीचे पदाधिकारी.

महाविद्यालयाला तिसऱ्या फेरीत काही दिवसांपूर्वी त्रिस्तरीय पीअर टीम समितीने भेट दिली. या समितीचे चेअरमन, प्रोफेसर के. मुथूचेलीयन, माजी कुलगुरु, पेरियार विद्यापीठ, मदुराई, डॉ. आर. जी. अलगी, माजी प्राचार्य, बसवेश्वर कॉमर्स कॉलेज, बागलकोट कर्नाटक हे समन्वयक तसेच प्रोफेसर एम. व्यंकटेश्वर, माजी हिंदी विभागप्रमुख हैदराबाद विद्यापीठ (तेलंगणा) हे सदस्य म्हणून लाभले होते.

या वेळी महाविद्यालयातील बी. व्होक. अभ्यासक्रम, क्रीडा विभाग, एन. एस. एस., एन. सी. सी., ग्रंथालय व प्रशासनाचे त्यांनी विशेष कौतुक केले. गुणवत्तापूर्ण व समर्पित प्राध्यापकवर्ग या महाविद्यालयात असल्याने संस्था व महाविद्यालयास स्वायत्ततेकडे वाटचाल करणे सहज शक्य आहे, अशा शब्दांत संस्थेचे समितीने कौतुक केले. याप्रसंगी विविध उपक्रमातील विद्यार्थी, पालक, संस्थाचालक तसेच माजी विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला.

महाविद्यालयामध्ये सध्या जवळपास १०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इथे पदवीस्तरावर २५ व पदव्युत्तर स्तरावर १८ विषयांचे अध्यापन केले जाते. बी.व्होकेशनल या व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत फूड प्रोसेसिंग अँड पोस्ट हार्वेस्ट टेक्नोलॉजी व जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन हे यूजीसीचे अभ्यासक्रम गेल्या दोन वर्षांपासून नव्याने सुरु करण्यात आले आहेत. विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रे आणि कार्यशाळांचे यशस्वी आयोजन केले आहे. महाविद्यालयास नुकताच यूजीसीकडून सीपीई हा दर्जा, डीबीटीतर्फे स्टार कॉलेज स्कीम तसेच 'डीएसटी फिस्ट' यासारख्या योजनांमधूनदेखील भरघोस अनुदान प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयएसओ ९००१-२००८ मानांकन महाविद्यालयाने मिळवलेले आहे, असे त्यांनी सांगितले.

तर अनेकांत परिवाराच्या प्रत्येक घटकाने विद्यार्थी केंद्रबिंदू मानून शैक्षणिक विकासाच्या योजना राबविल्या. शिक्षण विकासाच्या नवीन कल्पना अमलात आणण्यात आल्या. संस्थेने त्यांना पाठबळ दिल्याने आजचे यश मिळाले, असे सचिव जवाहर शाह यांनी सांगितले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अरहंतदास शहा, सुनील शहा, मिलिंद शाह, विकास शहा, डॉ. सजेंद्र मुथा, करण शाह, डॉ. राजकुमार छाजेड, अभिनंदन शहा यांच्या नियोजनाचे कौतुक करण्यात आले.प्रतिनिधी)

Tuljaram Chaturchand College Library Baramati

# टीसी महाविद्यालयास 'नॅक'कडून 'ए प्लस' श्रेणी

**बारामती : प्रतिनिधी**

बेंगलोरच्या राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेकडून (नॅक) येथील तुळजाराम चतुरचंद (टीसी) महाविद्यालयाला 'ए प्लस' श्रेणी जाहीर करण्यात आली आहे.

'नॅक'ने महाविद्यालयास ३.५५ गुण देत ही श्रेणी दिली आहे. ग्रामीण भागातील महाविद्यालयाला ही श्रेणी मिळणे म्हणजे महाविद्यालयाच्या इतिहासातील एक देदीप्यमान प्रगती आहे. या यशाने महाविद्यालयाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. याबाबतची माहिती अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अरहतदास सराफ, सचिव जवाहर वाघोलीकर, विश्वस्त विकास लेंगरेकर, सुनील लेंगरेकर, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा आदींनी दिली.



**'नॅक' समितीच्या भेटीवेळी या समिती सदस्यांसह अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, प्राचार्य व अन्य.**

महाविद्यालयाला तिसऱ्या फेरीत ०२ फेब्रुवारी ते ०४ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत त्रिस्तरीय पीअर टीम समितीने भेट दिली. या समितीचे अध्यक्ष व मदुराईच्या पेरियार विद्यापीठाचे माजी कुलगुरू के. मुथूचेलीयन, बागलकोट, कर्नाटकच्या बसवेश्वर कॉमर्स कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. आर. जी. अलगी हे समन्वयक तसेच हैद्राबाद विद्यापीठाचे माजी हिंदी विभागप्रमुख प्रा. एम. व्यंकटेश्वर हे सदस्य म्हणून लाभले होते. या वेळी महाविद्यालयातील विविध २५ विभागांची पाहणी करताना विशेषतः बी. व्होक. अभ्यासक्रम, क्रीडा विभाग, एन. एस. एस., एन. सी. सी., ग्रंथालय व प्रशासनाचे त्यांनी विशेष कौतुक केले. महाविद्यालयाचा देखणा परिसर व अत्याधुनिक सोई सुविधांनीयुक्त इमारती याची त्यांनी वाखाणणी केली. गुणवत्तापूर्ण व समर्पित प्राध्यापकवर्ग या महाविद्यालयात असल्याने संस्था व महाविद्यालयास स्वायत्ततेकडे वाटचाल करणे सहज शक्य आहे असे उद्गार काढताना त्यांनी संस्थाचालकांच्या कामाचे उल्लेखनीय कौतुक केले. याप्रसंगी विविध उपक्रमातील विद्यार्थी, पालक, संस्थाचालक तसेच माजी विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. या सर्वांच्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले.

महाविद्यालयास नुकताच युजीसीकडून 'सीपीई' हा दर्जा, डीबीटीतर्फे 'स्टार कॉलेज स्कीम' तसेच 'डीएसटी फिस्ट' यासारख्या योजनांमधूनदेखील भरघोस अनुदान प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'आयएसओ ९००१-२००८' मानांकन महाविद्यालयाने मिळवलेले आहे.

याबाबत संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर म्हणाले, विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवून शैक्षणिक विकासाच्या नवनवीन कल्पना घेऊन ज्या योजना यशस्वीपणे राबविल्या व संस्थेने नेहमीच त्यांना मनापासून पाठिंबा व बळ दिले त्यामुळेच हे यश प्राप्त झाले. संस्थेच्या यशात सुनील शहा, मिलिंद शहा, विकास शहा, डॉ. राजेंद्र मुथा, करण शहा, डॉ. राजकुमार छाजेड यांचे विशेष योगदान लाभले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दैनिक लोकमत दि 02/03/18 पान ५

# तुळजाराम महाविद्यालयास 'ए प्लस' श्रेणी

▲ बारामती, दि. १ : बंगलोरच्या राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेकडून (नॅक) येथील तुळजाराम चतुरचंद (टी.सी.) महाविद्यालयाला 'ए प्लस'श्रेणी जाहीर करण्यात आली आहे.


नॅकने महाविद्यालयास सीजीपीए ३.५५ गुण देत ही श्रेणी दिली आहे. ग्रामीण भागातील महाविद्यालयाला ही श्रेणी मिळणे म्हणजे महाविद्यालयाच्या इतिहासातील एक देदीप्यमान प्रगती आहे. नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय तर प्राचार्यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार दिला आहे. महाविद्यालयाला तिसऱ्या फेरीत काही दिवसांपूर्वी त्रिसदस्यीय पिअर टीम समितीने भेट दिली. या समितीचे चेअरमन, प्रोफेसर के.मुथूचेलीयन, माजी कुलगुरू, पेरियार विद्यापीठ, मदुराई, डॉ. आर. जी. अलगी, माजी प्राचार्य, बसवेश्वर कॉमर्स कॉलेज, बागलकोट कर्नाटक हे समन्वयक तसेच प्रोफेसर एम. व्यंकटेश्वर, माजी हिंदी विभागप्रमुख हैदराबाद विद्यापीठ (तेलंगणा) हे सदस्य म्हणून लाभले होते. याबाबत संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर म्हणाले, विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवून शैक्षणिक विकासाच्या नवनवीन कल्पना घेऊन ज्या योजना यशस्वीपणे राबविल्या व संस्थेने नेहमीच त्यांना मनापासून पाठिंबा व बळ दिले. त्यामुळेच हे यश प्राप्त झाले. संस्थेच्या यशात सुनील शहा, मिलिंद शहा, विकास शहा, डॉ. राजेंद्र मुथा, करण शहा, डॉ.राजकुमार छाजेड यांचे विशेष योगदान लाभले.

लोकमत 02/3/18 पान ५

College Library Baramati

साप्ताहिक रणशिंग
दि. २/३/२०१७ पान ४

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास नॅक, बेंगलोरकडून ए+ग्रेड प्राप्त



बारामती - राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद, (नॅक) बेंगलोर यांनी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास ए+ ग्रेड जाहीर केली. यामध्ये महाविद्यालयास सीजीपीए ३.५५ गुण प्राप्त झाले. महाविद्यालयाच्या इतिहासातील एक दैदीप्यमान प्रगती आहे. या यशाने महाविद्यालयाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. निश्चितच तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या दर्जाचा आलेख यामुळे उंचावला आहे. संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. अरहतदास शहा (सराफ) यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाची घोडदौड वेगात सुरू आहे. महाविद्यालयास दुसऱ्या फेरीत बी+सिजीपीए २.९२ श्रेणी मिळाली होती. महाविद्यालयास उच्च श्रेणी प्राप्त होण्याकरीता महाविद्यालयातील सर्व विभागांनी संशोधन, अध्यापन, अध्ययनाचा दर्जा उंचावण्यासाठी विशेष मेहनत घेतली. नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ करीता अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनाही उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्राप्त झाला. महाविद्यालयाला तिसऱ्या फेरीत दि. २ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत त्रिस्तरीय पीअर टीम समितीने भेट दिली. या समितीचे चेअरमन, प्रोफेसर के. मुथूचेलीयन, माजी कुलगुरू, पेरियार विद्यापीठ, मदुराई, डॉ.आर.जी. अलगी, माजी प्राचार्य, बसवेश्वर कॉमर्स कॉलेज, बागलकोट कर्नाटक 'हे समन्वयक तसेच प्रोफेसर एम. व्यंकटेश्वर, माजी हिंदी विभागप्रमुख हैदराबाद विद्यापीठ (तेलंगणा) हे सदस्य म्हणून लाभले होते. यावेळी महाविद्यालयातील विविध २५ विभागांची पाहणी करताना विशेषतः बी.व्होक. अभ्यासक्रम, क्रीडा विभाग, एन.एस.एस. एन.सी.सी. ग्रंथालय व प्रशासनाचे त्यांनी विशेष कौतुक केले. महाविद्यालयाचा देखणा परिसर व अत्याधुनिक सोई सुविधांनी युक्त इमारती याची त्यांनी वाखाणणी केली. गुणवत्तापूर्ण व समर्पित प्राध्यापकवर्ग या महाविद्यालयात असल्याने संस्था व महाविद्यालयास स्वायत्तेकडे वाटचाल करणे सहज शक्य आहे असे उद्गार काढताना त्यांनी संस्था चालकांच्या कामाचे उल्लेखनीय कौतुक केले. याप्रसंगी विविध उपक्रमातील विद्यार्थी, पालक, संस्थाचालक तसेच माजी विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. या सर्वांच्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले. महाविद्यालयामध्ये सध्या जवळपास १०००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इथे पदवीस्तरावर २५ व पदव्युत्तर स्तरावर १८ विषयांचे अध्यापन केले जाते. बी. व्होकेशनल या व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत फूड प्रोसेसिंग अँड पोस्ट हार्वेस्ट टेक्नोलॉजी व जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन हे युजीसीचे अभ्यासक्रम गेली दोन वर्षांपासून नव्याने सुरू करण्यात आले आहेत. महाविद्यालयात शैक्षणिक उपक्रमाबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना, कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वाद व वक्तृत्व स्पर्धा, कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, अनेक विद्यार्थीभिमुख उपक्रम राबविले जातात. विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रे आणि कार्यशाळांचे यशस्वीरित्या आयोजन करून महाविद्यालयाने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. महाविद्यालयास नुकताच युजीसी कडून सीपीई हा दर्जा, डीबीटीतर्फे स्टार कॉलेज स्कीम तसेच डीएसटी फिस्ट यासारख्या योजनांमधून देखील भरघोस अनुदान प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयएसओ ९००१-२००८ मानांकन महाविद्यालयाने मिळवलेले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयातील सर्व घटकांचे सर्वत्र विशेष कौतुक होत आहे.

Tuljaram Chaturchand College
Library
* Baramati *

प्रा. प्राचार्य साहेब,

पुण्य नगरी दि. ०२/०३/२०१७ पान ५ Baramati Rural NEWS

# 'तुळजाराम चतुरचंद'ला नॅककडून 'ए प्लस' ग्रेड



## स्वायत्ततेकडे वाटचाल शक्य

नॅकच्या समितीने महाविद्यालयातील विविध २५ विभागांची पाहणी करताना विशेषतः बी. व्होक. अभ्यासक्रम, क्रीडा विभाग, एन.एस.एस., एन.सी.सी., ग्रंथालय व प्रशासनाचे विशेष कौतुक केले. या महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण व समर्पित प्राध्यापक वर्ग असल्याने संस्था व महाविद्यालयास स्वायत्ततेकडे वाटचाल करणे सहज शक्य आहे, असे समितीने नमूद केले.

बारामती : प्रतिनिधी

राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद, (नॅक) बेंगलोर यांनी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास ए प्लस ग्रेड जाहीर केली. यामध्ये महाविद्यालयास सीजीपीए ३.५५ गुण प्राप्त झाले. महाविद्यालयाच्या इतिहासातील ही एक देदीप्यमान प्रगती आहे. या यशाने महाविद्यालयाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला गेला आहे, असे संस्थेचे अध्यक्ष अरहंतदास शहा, सचिव जवाहर वाघोलीकर व प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

जवाहर वाघोलीकर म्हणाले, संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा (सराफ) यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाची घोडदौड वेगात सुरू आहे. महाविद्यालयास दुसऱ्या फेरीत बी प्लस सीजीपीए २.९२ श्रेणी मिळाली होती. नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ करिता अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास 'उत्कृष्ट महाविद्यालय' तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनाही 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' प्राप्त झाला. महाविद्यालयाला तिसऱ्या फेरीत दि. २ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत त्रिस्तरीय पीअर टीम समितीने भेट दिली. या समितीमध्ये चेअरमन, प्रा. के. मुथूचेलीयन, माजी कुलगुरू, पेरियार विद्यापीठ, मदुराई, डॉ. आर. जी. अलगी, माजी प्राचार्य, बसवेश्वर कॉमर्स कॉलेज, बागलकोट कर्नाटक, प्रा. एम. व्यंकटेश्वर, माजी हिंदी विभागप्रमुख हैदराबाद विद्यापीठ (तेलंगणा) सदस्य यांचा समावेश होता. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी महाविद्यालयाच्या माध्यमातून पुढील काळात अनेक उपक्रमांबरोबरच विदेशी भाषांचे अध्यापन वर्ग सुरू केले जाणार असल्याचे सांगितले. या वेळी संस्थेचे संचालक विकास लेंगरेकर, मिलिंद शहा यांच्यासह रजिस्ट्रार अभिनंदन शहा आदी उपस्थित होते.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

दैनिक ऐक्य, सातारा.

८ गुरुवार, दि. २ मार्च २०१७

# तुळजाराम महाविद्यालयास 'ए प्लस' श्रेणी

▲ बारामती, दि. १ : बंगलोरच्या राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेकडून (नॅक) येथील तुळजाराम चतुरचंद (टी.सी.) महाविद्यालयाला 'ए प्लस'श्रेणी जाहीर करण्यात आली आहे.

नॅकने महाविद्यालयास सीजीपीए ३.५५ गुण देत ही श्रेणी दिली आहे. ग्रामीण भागातील महाविद्यालयाला ही श्रेणी मिळणे म्हणजे महाविद्यालयाच्या इतिहासातील एक देदीप्यमान प्रगती आहे. नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय तर प्राचार्यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार दिला आहे. महाविद्यालयाला तिसऱ्या फेरीत काही दिवसांपूर्वी त्रिसदस्यीय पिअर टीम समितीने भेट दिली. या समितीचे चेअरमन, प्रोफेसर के.मुथूचेलीयन, माजी कुलगुरू, पेरियार विद्यापीठ, मदुराई, डॉ. आर. जी. अलगी, माजी प्राचार्य, बसवेश्वर कॉमर्स कॉलेज, बागलकोट कर्नाटक हे समन्वयक तसेच प्रोफेसर एम. व्यंकटेश्वर, माजी हिंदी विभागप्रमुख हैदराबाद विद्यापीठ (तेलंगणा) हे सदस्य म्हणून लाभले होते. याबाबत संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर म्हणाले, विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवून शैक्षणिक विकासाच्या नवनवीन कल्पना घेऊन ज्या योजना यशस्वीपणे राबविल्या व संस्थेने नेहमीच त्यांना मनापासून पाठिंबा व बळ दिले. त्यामुळेच हे यश प्राप्त झाले. संस्थेच्या यशात सुनील शहा, मिलिंद शहा, विकास शहा, डॉ. राजेंद्र मुथा, करण शहा, डॉ.राजकुमार छाजेड यांचे विशेष योगदान लाभले.

Tuljaram Chaturchand College * Baramati
Library

पुण्य नगरी दि. 02/03/2017 पान 5

# 'तुळजाराम चतुरचंद'ला नॅककडून 'ए प्लस' ग्रेड



## स्वायत्ततेकडे वाटचाल शक्य

नॅकच्या समितीने महाविद्यालयातील विविध २५ विभागांची पाहणी करताना विशेषतः बी. व्होक. अभ्यासक्रम, क्रीडा विभाग, एन.एस.एस., एन.सी.सी., ग्रंथालय व प्रशासनाचे विशेष कौतुक केले. या महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण व समर्पित प्राध्यापक वर्ग असल्याने संस्था व महाविद्यालयास स्वायत्ततेकडे वाटचाल करणे सहज शक्य आहे, असे समितीने नमूद केले.

■ बारामती : प्रतिनिधी

राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद, (नॅक) बेंगलोर यांनी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास ए प्लस ग्रेड जाहीर केली. यामध्ये महाविद्यालयास सीजीपीए ३.५५ गुण प्राप्त झाले. महाविद्यालयाच्या इतिहासातील ही एक देदीप्यमान प्रगती आहे. या यशाने महाविद्यालयाच्या शिरपेचात एक मा तुरा खोवला गेला आहे, असे संस्थेचे अध्यक्ष अरहंतदास शहा, सचिव जवाहर वाघोलीकर व प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

जवाहर वाघोलीकर म्हणाले, संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा (सराफ) यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाची घोडदौड वेगात सुरू आहे. महाविद्यालयास दुसऱ्या फेरीत बी प्लस सीजीपीए २.९२ श्रेणी मिळाली होती. नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ करिता अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास 'उत्कृष्ट महाविद्यालय' तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनाही 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' प्राप्त झाला. महाविद्यालयाला तिसऱ्या फेरीत दि. २ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत त्रिस्तरीय पीअर टीम समितीने भेट दिली. या समितीमध्ये चेअरमन, प्रा. के. मुथूचेलीयन, माजी कुलगुरू, पेरियार विद्यापीठ, मदुराई, डॉ. आर. जी. अलगी, माजी प्राचार्य, बसवेश्वर कॉमर्स कॉलेज, बागलकोट कर्नाटक, प्रा. एम. व्यंकटेश्वर, माजी हिंदी विभागप्रमुख हैदराबाद विद्यापीठ (तेलंगणा) सदस्य यांचा समावेश होता. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी महाविद्यालयाच्या माध्यमातून पुढील काळात अनेक उपक्रमांबरोबरच विदेशी भाषांचे अध्यापन वर्ग सुरू केले जाणार असल्याचे सांगितले. या वेळी संस्थेचे संचालक विकास लेंगरेकर, मिलिंद शहा यांच्यासह रजिस्ट्रार अभिनंदन शहा आदी उपस्थित होते.

Chaturchand College Library Baramati

मा.प्राचार्य साहेब

सा. कऱ्हाभिमा टाईम्स शुक्रवार दि. ०३ मार्च २०१७ पान ४

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास नॅक, बेंगलोरकडून ए+ ग्रेड प्राप्त

बारामती: राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद, (NAC ) बेंगलोर यांनी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास ए+ ग्रेड जाहीर केली. यामध्ये महाविद्यालयास सीजीपीए ३.५५ गुण प्राप्त झाले. महाविद्यालयाच्या इतिहासातील एक दैदीप्यमान प्रगती आहे. या यशाने महाविद्यालयाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. निश्चितच तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या दर्जाचा आलेख यामुळे उंचावला आहे. संस्थेचे अध्यक्ष अरहंतदास शहा यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाची घोडदौड वेगात सुरु आहे. महाविद्यालयास दुस-या फेरीत बी + सिजीपीए २.९९ श्रेणी मिळाली होती. महाविद्यालयास उच्च श्रेणी प्राप्त होण्याकरिता महाविद्यालयातील सर्व विभागांनी संशोधन, अध्यापन, अध्ययनाचा दर्जा उंचावण्यासाठी विशेष मेहनत घेतली. नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष सन २०१६–१७ करिता अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांनाही उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्राप्त झाला. महाविद्यालयाला तिस–या फेरीत दि.२ फेब्रुवारी ते ४फेब्रुवारी २०१७ या कालावधीत त्रिस्तरीय पीअर टीम समितीने भेट दिली. या समितीचे चेअरमन, प्रोफेसर के.मुथूचेलीयन, माजी कुलगुरू, पेरियार विद्यापीठ, मदुराई, डॉ.आर.जी.अलगी, माजी प्राचार्य, बसवेश्वर कॉमर्स कॉलेज, बागलकोट कर्नाटक हे समन्वयक तसेच प्रोफेसर एम.व्यंकटेश्वर, माजी हिंदी विभागप्रमुख हैदराबाद विद्यापीठ (तेलंगणा) हे सदस्य म्हणून लाभले होते. यावेळी महाविद्यालयातील विविध २५ विभागांची पाहणी करताना विशेषत: बी.व्होक. अभ्यासक्रम, क्रीडा विभाग, एन.एस.एस., एन.सी.सी., ग्रंथालय व प्रशासनाचे त्यांनी विशेष कौतुक केले. महाविद्यालयाचा देखणा परिसर व अत्याधुनिक सोई सुविधांनीयुक्त इमारती याची त्यांनी वाखाणणी केली. गुणवत्तापूर्ण व समर्पित प्राध्यापक वर्ग या महाविद्यालयात असल्याने संस्था व महाविद्यालयास स्वायत्ततेकडे वाटचाल करणे सहज शक्य आहे असे उद्गार काढताना त्यांनी . संस्थाचालकांच्या कामाचे उल्लेखनीय कौतुक केले. याप्रसंगी विविध उपक्रमातील विद्यार्थी, पालक, संस्थाचालक तसेच माजी विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. या सर्वांच्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले. महाविद्यालयामध्ये सध्या जवळपास १० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इथे २५ पदवीस्तरावर व पदव्युत्तर स्तरावर १८ विषयांचे अध्यापन केले जाते. बी.व्होकेशनल या व्यावसायिक अभ्यासक्रमांर्गत फुड प्रोसेसिंग अँड पोस्ट हार्वेस्ट टेक्नोलॉजी व जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन हे युजीसीचे अभ्यासक्रम गेली दोन वर्षापासून नव्याने सुरु करण्यात आले आहेत. महाविद्यालयात शैक्षणिक उपक्रमाबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना, कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वाद व वक्तृत्व स्पर्धा, कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, अनेक विद्यार्थीभिमूख उपक्रम राबविले जातात. विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रे आणि कार्यशाळांचे यशस्वीरित्या आयोजन करून



महाविद्यालयाने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. महाविद्यालयास नुकताच युजीसी कडून सीपीई हा दर्जा, डीबीटी तर्फे स्टार कॉलेज स्कीम तसेच डीएसटी फिस्ट यासारख्या योजनांमधून देखील भरघोस अनुदान प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयएसओ ९००१–२००८ मानांकन महाविद्यालयाने मिळवलेले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयातील सर्व घटकांचे सर्वत्र विशेष कौतुक होत आहे.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

मा॰ प्राचार्य साहेब,

सा॰ आक्रोश दि. ०२/०२/२०१७ ते ०८/०२/२०१७ पान १ व ६

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय तर डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार जाहीर






बारामती : नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ करिता विद्यापीठ वर्धापनदिनी देण्यात येणाऱ्या 'उत्कृष्ट महाविद्यालय' (ग्रामीण विभाग, अव्यावसायिक महाविद्यालय) पुरस्काराकरिता अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाची घोषणा केली आहे. . याचवेळी विद्यापीठातर्फे 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराकरिता' महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांची घोषणा केली आहे. विद्यापीठाच्या वर्धापन दिनी १० फेब्रुवारी रोजी मा. कुलगुरूंच्या हस्ते रक्कम रुपये ३ लाख व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देवून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

बारामतीतील प्रतिष्ठित अनेकान्त एज्युकेशन सोसायटीची स्थापना जैन धर्मीयांचे परमपूज्य गुरुदेव १०८ श्री समन्तभद्र महाराज यांच्या आशीर्वादाने आणि हैद्राबाद राज्याचे तत्कालीन शिक्षणमंत्री स्व.फुलचंदजी गांधी यांच्या पुढाकाराने २७ एप्रिल १९६१ साली झाली. संस्थेच्या अध्यक्षपदी सध्या मा.श्री.अरहतदास हिराचंद शहा (सराफ), सचिवपदी मा.श्री.जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर) व खजिनदारपदी मा.श्री.सुनील शिवलाल शहा (लेंगरेकर) कार्यरत आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून या महाविद्यालयाची स्थापना जून १९६२ रोजी करण्यात आली. तुळजाराम चतुरचंद

(पान नं. ४ वर...

Tuljaram Chatur Chand College Library * Baramati *

7774014293.

पान ४

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय तर डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार जाहीर

पान नं. १ वरुन...

महाविद्यालयाची सुरुवात ११९ विद्यार्थी व केवळ ११ प्राध्यापकांच्या संख्येने झाली आहे. आता या महाविद्यालयामध्ये सध्या जवळपास १०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इथे पदवीस्तरावर २५, पदव्युत्तर स्तरावर १८ विषयांचे अध्यापन केले जाते. बी.व्होकेशनल या व्यावसायिक अभ्यासक्रमांर्गत फूड प्रोसेसिंग अँड पोस्ट हार्वेस्ट टेक्नोलॉजी व जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन हे अभ्यासक्रम गेली दोन वर्षापासून नव्याने सुरु करण्यात आले आहेत. महाविद्यालयात शैक्षणिक उपक्रमाबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना, कविवर्य भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, अनेक विद्यार्थीभिमूख उपक्रम राबविले जातात. विविध राज्यस्तरीय,राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रे आणि कार्यशाळांचे यशस्वीरित्या आयोजन करून महाविद्यालयाने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. महाविद्यालयास नुकताच युजीसी कडून 'सीपीई' हा दर्जा डीबीटी तर्फे 'स्टार कॉलेज स्कीम' हा दर्जा तसेच'डीएसटी फिस्ट' यासारख्या योजनांमधून देखील अनुदान प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'आयएसओ ९००१-२००८' मानांकन महाविद्यालयाने मिळवलेले आहे.

महाविद्यालयास दैनंदिन मार्गदर्शन करणेकामी मा.श्री.मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर), मा.श्री.विकास शशिकांत शहा (लेंगरेकर), मा.श्री.करण चंद्रगुप्त शहा (वाघोलीकर) यांचे नेहमीच विशेष सहकार्य लाभते.

मा.डॉ.चंद्रशेखर मुरुमकर हे गेल्या ३० वर्षापासून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये अध्यापन करत आहेत. तर गेल्या ९ वर्षापासून ते महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. वनस्पतीशास्त्र या विषयात त्यांचे ६० हून अधिक संशोधन लेख अनेक ख्यातनाम राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून प्रसिद्ध झाले आहेत. अकॅडमी ऑफ प्लँट सायन्सेस, इंडिया (एपीएसआय) या संस्थेतर्फे 'आंतरराष्ट्रीय प्लँट सायंटीस्ट पुरस्कार' देखील त्यांना प्राप्त झाला आहे. महाविद्यालयामध्ये प्रथमच बॉटनी या विभागांतर्गत आंतरराष्ट्रीय परिषदेचे त्यांनी आयोजन केले होते. या परिषदेमध्ये संपूर्ण भारतातून व परदेशातून अनेक ख्यातनाम शास्त्रज्ञ, तज्ञ संशोधक या परिषदेमध्ये सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे 'बालभारती' च्या शास्त्र समितीच्या अध्यक्षपदी कार्यरत राहून प्राथमिक, माध्यमिक स्तरावरून विविध बदल, नवनवीन संकल्पना, विविध योजना इ. द्वारे शैक्षणिक क्षेत्रामध्ये विकासाचे परिवर्तन ते करीत आहेत. डॉ. मुरुमकर यांचे अनेक विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत.

महाविद्यालयाची आज यशस्वी पणे वाटचाल सुरु आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी देशभरात विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. याचा संस्थेला व महाविद्यालयाला सार्थ अभिमान आहे.

महाविद्यालयास प्राप्त झालेल्या या यशाबद्दल संस्थेचे मा.श्री.अरहतदास हिराचंद शहा (सराफ), सचिव श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर), मा.श्री.सुनील शिवलाल शहा (लेंगरेकर), मा.श्री.मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर), मा.श्री.विकास शशिकांत शहा (लेंगरेकर), मा.डॉ.राजेंद्र माणिकलाल मुथा, मा.श्री.करण शाह (वाघोलीकर), मा.डॉ.राजकुमार छाजेड व संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी मा. प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य प्रा. एम.के.कोकरे, डॉ. शिवाजी साठे, डॉ. रंजना नेमाडे, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा, तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांचे कौतुक करून विशेष हार्दिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरिता सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत.

* *

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दै. प्राईड बारामती दि. ७/३/२०१७ पान ६

## थोडक्यात

### अनेकांत इंग्लिश स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन संपन्न

बारामती : प्रतिनिधी

येथील अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मीडिअम स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शन उत्साहात पार पडले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या हस्ते झाले. यावेळी, शाळा समिती सदस्य धवल अभयकुमार शहा (वाघोलीकर), सोनिक आदर्श शहा (पंदारकर) उपस्थित होते. प्रदर्शनात शाळेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. प्रसंगी, विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रोजेक्टची माहिती उपस्थित मान्यवर व पालकांना देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या प्रोजेक्टचे कौतुक करत पालकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रदर्शन यशस्वितेसाठी प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

Baramati * Tuljaram Chaturchand College Library

लोकमत दि. ७/३/२०१७ पान २

## मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. वायुनंदन

खास प्रतिनिधी, मुंबई

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या लोकप्रशासन विभागातील प्राध्यापक डॉ ई. वायुनंदन यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यपाल तथा कुलपती चेन्नमनेनी विद्यासागर राव यांनी सोमवारी डॉ. वायुनंदन यांच्या नियुक्तीची घोषणा केली. डॉ. वायुनंदन यांची नियुक्ती पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी करण्यात आली आहे. डॉ वायुनंदन यांनी हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठातून लोकप्रशासन या विषयात एम.ए., एम.फील., तसेच पीएच.डी. प्राप्त केली असून उच्च शिक्षण क्षेत्रातील अध्यापन तसेच संशोधनाचा त्यांना व्यापक अनुभव आहे.

डॉ. माणिकराव साळुंखे यांनी १९ ऑगस्ट, २०१६ला मुदतीपूर्वी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा राजीनामा दिल्यामुळे हे पद रिक्त झाले होते. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार पाहत होते. मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या नियुक्तीसाठी राज्यपालांनी मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश न्या. मोहित शाह यांच्या अध्यक्षतेखाली कुलगुरू निवड समिती गठित केली होती. दिल्लीच्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रा. अजय कुमार शर्मा आणि राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव सीताराम कुंटे हे समितीचे सदस्य होते. समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्यानंतर राज्यपालांनी वायुनंदन यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

लोकमत ७/३/१७

# थोडक्यात

## अनेकांत इंग्लिश स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन संपन्न

बारामती : प्रतिनिधी

येथील अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मीडिअम स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शन उत्साहात पार पडले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या हस्ते झाले. यावेळी, शाळा समिती सदस्य धवल अभयकुमार शहा (वाघोलीकर), सोनिक आदर्श शहा (पंदारकर) उपस्थित होते. प्रदर्शनात शाळेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. प्रसंगी, विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रोजेक्टची माहिती उपस्थित मान्यवर व पालकांना देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या प्रोजेक्टचे कौतुक करत पालकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रदर्शन यशस्वितेसाठी प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

Tuljaram Chaturchand College * Baramati * Library

# मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. वायुनंदन

खास प्रतिनिधी, मुंबई

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या लोकप्रशासन विभागातील प्राध्यापक डॉ ई. वायुनंदन यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यपाल तथा कुलपती चेन्नमनेनी विद्यासागर राव यांनी सोमवारी डॉ. वायुनंदन यांच्या नियुक्तीची घोषणा केली. डॉ. वायुनंदन यांची नियुक्ती पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी करण्यात आली आहे. डॉ वायुनंदन यांनी हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठातून लोकप्रशासन या विषयात एम.ए., एम.फील., तसेच पीएच.डी. प्राप्त केली असून उच्च शिक्षण क्षेत्रातील अध्यापन तसेच संशोधनाचा त्यांना व्यापक अनुभव आहे.

डॉ. माणिकराव साळुंखे यांनी १९ ऑगस्ट, २०१६ला मुदतपूर्वी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा राजीनामा दिल्यामुळे हे पद रिक्त झाले होते. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार पाहत होते. मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या नियुक्तीसाठी राज्यपालांनी मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश न्या. मोहित शाह यांच्या अध्यक्षतेखाली कुलगुरू निवड समिती गठित केली होती. दिल्लीच्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रा. अजय कुमार शर्मा आणि राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव सीताराम कुंटे हे समितीचे सदस्य होते. समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्यानंतर राज्यपालांनी वायुनंदन यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

मा. प्राचार्य साहेब

02 दि. १९ फेब्रुवारी २०१७ साप्ताहिक निरा बारामती वार्ता

# टी. सी. कॉलेजला उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार




पुणे: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ करिता अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास 'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार प्रदान केला. दि. १० फेब्रुवारी २०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात आयोजिलेल्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे मा. श्री. अरुण फिरोदिया, संचालक, कायनेटिक इंजिनीअरिंग लिमिटेड व मा. डॉ. वासुदेव गाडे, कुलगुरू यांचे हस्ते रक्कम रुपये ३ लाख व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून महाविद्यालयास गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अरहतदास हिराचंद शहा सराफ, सचिव जवाहर मोतीलाल शहा, मा. श्री. मिलिंद शहा, मा. श्री. विकास शहा, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य एम. के. कोकरे, डॉ. शिवाजी साठे, डॉ. रंजना नेमाडे, आय. क्यू. ए. सी. सदस्य व विविध उपक्रमांचे प्रमुख, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संस्था व महाविद्यालयाच्या इतिहासातील हा अविस्मरणीय क्षण होता.

याचवेळी विद्यापीठातर्फे महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनाही ''उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

या महाविद्यालयामध्ये सध्या जवळपास १०००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इथे पदवीस्तरावर २५, पदव्युत्तर स्तरावर १८ विषयांचे अध्यापन केले जाते. बी.व्होकेशनल या व्यावसायिक अभ्यासक्रमांर्गत फूड प्रोसेसिंग अँड पोस्ट हार्वेस्ट टेक्नोलॉजी व जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन हे अभ्यासक्रम गेली दोन वर्षापासून नव्याने सुरु करण्यात आले आहेत.

महाविद्यालयात शैक्षणिक उपक्रमाबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना, कविवर्य भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, अनेक विद्यार्थीभिमूख उपक्रम राबविले जातात. विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रे आणि कार्यशाळांचे यशस्वीरित्या आयोजन. करून महाविद्यालयाने आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

महाविद्यालयास नुकताच युजीसी कडून 'सीपीई' हा दर्जा, डीबीटी तर्फे 'स्टार कॉलेज स्कीम' हा दर्जा तसेच 'डीएसटी फिस्ट' यासारख्या योजनांमधून देखील अनुदान प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'आयएसओ ९००१-२००८' मानांकन महाविद्यालयाने मिळवलेले आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. चंद्रशेखर मुरुमकर हे गेल्या ३० वर्षापासून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये अध्यापन करत आहेत. तर गेल्या ९ वर्षापासून ते महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत.

वनस्पतीशास्त्र या विषयात त्यांचे ६० हून अधिक संशोधन लेख अनेक ख्यातनाम राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून प्रसिद्ध झाले आहेत. अकॅडेमि ऑफ प्लँट सायन्सेस, इंडिया (एपीएसआय) या संस्थेतर्फे 'आंतरराष्ट्रीय प्लँट सायंटीस्ट पुरस्कार' देखील त्यांना प्राप्त झाला आहे. महाविद्यालयामध्ये प्रथमच बॉटनी या विषयाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे त्यांनी आयोजन केले होते. या परिषदेमध्ये संपूर्ण भारतातून व परदेशातून अनेक ख्यातनाम शास्त्रज्ञ, तज्ञ संशोधक या परिषदेमध्ये सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे 'बालभारती' च्या शास्त्र समितीच्या अध्यक्षपदी कार्यरत राहून प्राथमिक, माध्यमिक स्तरावरून विविध शैक्षणिक बदल, नवनवीन संकल्पना, विविध योजना इ. द्वारे शैक्षणिक क्षेत्रामध्ये विकासाचे परिवर्तन ते करीत आहेत. डॉ.मुरुमकर यांचे आज अनेक विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत.

महाविद्यालयास प्राप्त झालेल्या या भरीव यशाबद्दल संस्थेचे मा.श्री.अरहतदास हिराचंद शहा (सराफ), सचिव श्री.जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर), मा.श्री. सुनील शिवलाल शहा (लेंगरेकर), मा.श्री. मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर), मा.श्री.विकास शशिकांत शहा (लेंगरेकर), मा. डॉ. राजेंद्र माणिकलाल मुथा, मा. श्री. करण शाह (वाघोलीकर), मा. डॉ. राजकुमार छाजेड व संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी मा. प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य प्रा. एम.के. कोकरे, डॉ. शिवाजी साठे, डॉ. रंजना नेमाडे, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा, तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांचे कौतुक करून विशेष हार्दिक अभिनंदन केले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दै. पुढारी दि. २४/३/१७ पान ८

पुढारी २४/३/१७ पुरवणी पान, ८.

# टी. सी. महाविद्यालयात कार्यशाळा

**बारामती : प्रतिनिधी**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये 'लघुपट-सामाजिक भान आणि वास्तव' या विषयावर नुकतीच एकदिवसीय कार्यशाळा पार पडली. विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमांतर्गत ही कार्यशाळा घेण्यात आली होती. ज्येष्ठ लेखक राज काझी, माध्यमतज्ज्ञ प्रा. विश्राम ढोले, दिग्दर्शक प्रसाद मिराजदार आणि लेखक विक्रांत पवार यांनी विद्यार्थ्यांना या कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

दोन सत्रांमध्ये पार पडलेल्या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना कम्पल्सरी हेल्मेट, घड्याळाचा दवाखाना, गिरणी, आयडेंटी, टू प्लस टू हे लघुपट दाखवण्यात आले. त्याचबरोबर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी निर्मिती केलेले ब्रेक दी सायलेन्स, निश्चय आणि रिंगण हे लघुपट या वेळी प्रथमच प्रदर्शित करण्यात आले. कार्यशाळेमध्ये उद्घाटन व समारोप कार्यक्रमात होणारी पाहुण्यांची भाषणे, हार, सत्कार याला फाटा देत, विद्यार्थी संवादाला जास्त महत्त्व देण्यात आले. विद्यार्थ्यांना लघुपट दाखवून त्या लघुपटाची निर्मिती, रचनातंत्र, सौंदर्यस्थळे, आशय परीघ तसेच लघुपटाचे लेखन या विषयांवर प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर लघुपट कसा पाहावा, याचेही मार्गदर्शन या वेळी तज्ज्ञांनी केले.

लघुपट हे चित्रपटांच्या ताकदीचे माध्यम असल्याचे मत लेखक राज काझी यांनी मांडले. लघुपटाचा आशय आपल्याला सभोवतालच्या परिस्थितीशी जोडता आला पाहिजे असा विचार प्रा. विश्राम ढोले यांनी मांडला. व्यक्तिमत्त्व विकास हे टप्प्याने पण जाणीवपूर्वक घडवावे लागते, असे प्रसाद मिरासदार म्हणाले. विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील १५२ विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती.

विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा अभिनव पद्धतीने राबवण्याची संकल्पना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी मांडली. सर्व औपचारिकता टाळून अनोख्या पद्धतीने ही कार्यशाळा पार पडल्यामुळे सर्वांनी समाधान व्यक्त केले.

. प्रास्ताविक डॉ. सीमा नाईक गोसावी यांनी केले. प्रा. मुक्ता आंभेरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जयेंद्र राणे यांनी आभार मानले. या वेळी स्वाती कड्, रितेश साळवे, विकास ऐवळे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

मा. प्राचार्य साहेब

बारामती दर्पण पान ४ मंगळवार दि. १४ मार्च ते २० मार्च २०१७

# तु.च महाविद्यालयात विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा संपन्न



बारामती - बारामतीमधील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालया मध्ये लघुपट- सामाजिक भान आणि वास्तव या विषयावर दि. १० मार्च २०१७ रोजी एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास कार्यक्रमा अंतर्गत ही कार्यशाळा घेण्यात आली होती. ज्येष्ठ लेखक राज काझी, माध्यम तज्ज्ञ प्रा. विश्राम ढोले, दिग्दर्शक प्रसाद मिराजदार आणि लेखक विक्रांत पवार यांनी विद्यार्थ्यांना या कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

दोन सत्रांमध्ये पार पडलेल्या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना कंपल्सरी हेल्मेट, घड्याळांचा दवाखाना, गिरणी, आयडेंटी, टू प्लस टू हे लघुपट दाखवण्यात आले. त्याचबरोबर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी निर्मिती केलेले ब्रेक दी सायलेन्स, निश्चय आणि रिंगण हे लघुपट यावेळी प्रथमच प्रदर्शित करण्यात आले. कार्यशाळामध्ये उद्घाटन व समारोप कार्यक्रमात होणारी पाहुण्यांची भाषणे, हार सत्कार याला फाटा देत, विद्यार्थी संवादाला जास्त महत्व देण्यात आले. विद्यार्थ्यांना लघुपट दाखवून त्या लघुपटाची निर्मिती, रचनातंत्र, सौंदर्यस्थळे, आशयपरिघ तसेच लघुपटाचे लेखन या विषयांवर प्रश्नोत्तराच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर लघुपट कसा पहावा? याचेही मार्गदर्शन यावेळी तज्ज्ञांनी केले.

लघुपट हे चित्रपटांच्या ताकदीचे माध्यम असल्याचे मत लेखक राज काझी यांनी मांडले, तर लघुपटाचा आशय आपल्याला सभोवतालच्या परिस्थितीशी जोडता आला पाहिजे असा विचार प्रा. विश्राम ढोले यांनी मांडला तर व्यक्तिमत्व विकास हे टप्प्यांने पण जाणिवपुर्वक घडवावे लागते असे प्रसाद मिरासदार म्हणाले. विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील १५२ विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती.

# टीसी कॉलेज-सुंदर सिक्कीममध्ये सामंजस्य कर।

**बारामती, ता. १८ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व गंगटोक कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर इंजिनिअरिंग अँड पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी आणि सुंदर सिक्कीम प्रा. लि. यांच्यामध्ये संशोधन व प्रशिक्षणासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अन्नप्रक्रिया उद्योगाविषयी सखोल माहिती मिळावी व या क्षेत्रात त्यांना करिअर करता यावे, या उद्देशाने हा सामंजस्य करार करण्यात आल्याची माहिती अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अरहतदास सराफ व सचिव जवाहर वाघोलीकर यांनी दिली. अन्नप्रक्रिया हा जगभरात वेगाने विस्तारणारा उद्योग आहे. त्याची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी व या क्षेत्रात आपले स्थान निर्माण



**बारामती : टीसी महाविद्यालय व कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर इंजिनिअरिंग अँड पोस्ट हार्वेस्टिंग टेक्नॉलॉजीमध्ये सामंजस्य करार झाला. तो दाखविताना (डावीकडून) 'टीसी'चे कुलसचिव अभिनंदन शहा, कुलपती डॉ. आर. पी. मिश्रा, डॉ. वाजीद खान व प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर.**

करता यावे या उद्देशाने आणि सेंद्रिय उत्पादनांना असलेली मोठी मागणी विचारात घेता या क्षेत्रातही विद्यार्थ्यांना माहिती मिळावी, या उद्देशाने हा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

ईशान्य भारतातील अनेक अन्नप्रक्रिया क्षेत्रात भरीव कामगिरी करीत आहेत. त्या भागातील विद्यापीठांमध्ये या विषयांवर मोठे संशोधनही होत आहे. याचा फायदा बारामतीतील विद्यार्थ्यांन करून देण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलल्याचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी नमूद केले. या सामंजस्य करारामुळे सिक्कीम व महाराष्ट्र या दोन्ही राज्यांना परस्परांच्या अन्नप्रक्रिया उद्योगाबाबत देवाणघेवाण करता येईल व याचा दोघांनाही फायदा होईल, असे मत कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर इंजिनिअरिंग अँड पोस्ट हार्वेस्टिंग टेक्नॉलॉजीचे कुलपती डॉ. आर. पी. मिश्रा यांनी व्यक्त केले. गंगटोक येथे झालेल्या सामंजस्य करारामध्ये प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, कुलसचिव अभिनंदन शहा यांच्यासह फूड टेक्नॉलॉजी अँड रिसर्च विभागप्रमुख डॉ. वाजीद खान यांनी प्रतिनिधित्व केले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

ABS 21-7-17

दि १५/७/२०१७ पान ५

ज्ञानशक्ति

# 'तुळजाराम' महाविद्यालयाचा शैक्षणिक सामंजस्य करार

## सेंद्रीय उत्पादनासाठी सुंदर सिक्कीमशी करार; आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख

। बारामती ✍ प्रतिनिधी।

**बारामती** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी व तंत्रज्ञानाच्या कक्षा वाढाव्यात यासाठी आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. यासाठी कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर इंजिनिअरिंग अॅन्ड पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी या गंगटोक सिक्कीम येथील महाविद्यालयाबरोबर शैक्षणिक सामंजस्य करार केला आहे. सेंद्रीय उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या सुंदर सिक्कीम प्रा.लि. गंगटोक या उद्योगासोबतही संशोधन आणि प्रशिक्षण



करार करण्यात आला आहे. हा सामंजस्य करार दोन्ही महाविद्यालयांनाच नव्हे तर सिक्कीम आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांना मोठाच फायदेशीर ठरणार असल्याचा विश्वास कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर इंजिनिअरिंग अॅन्ड पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजीचे अधिष्ठाता डॉ. आर.पी. मिश्रा यांनी व्यक्त केला आहे.

हा करार गंगटोक येथे संपन्न झाला असून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर फुड अॅन्ड टेक्नॉलॉजी अॅन्ड रिसर्चचे विभागप्रमुख डॉ. वाजिद खान रजिस्टार अभिनंदन शहा यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये ईशान्येकडील राज्ये आघाडीवर आहेत हे महत्त्वाचे आहे. तसेच ईशान्येकडील विद्यापिठामध्ये संशोधने मोठया प्रमाणावर होत आहेत. याचा फायदा बारामती इंदापुर या परिसरातील विद्यार्थ्यांना व्हावा या हेतुनेच महाविद्यालयात हे पाऊल उचलले आहे या सामंजस्य करारा मुळे विद्यार्थी प्राध्यापकांना संशोधनाची नवी दालने खुली झाली आहेत. या सामंजस्य करारामुळे प्राध्यापक व विद्यार्थ्यांना संयुक्तपणे शैक्षणिक व संशोधन उपक्रम राबवता येणार असून शैक्षणिक साहित्य प्रकाशने व इतर माहितीची देवाणघेवाण करण्यास चांगली मदत होईल असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी सांगितले.

ज्ञानशक्ति १५/७/१७

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

दै. लोकमत दि. २२/०७/२०१७ पान ५



# मा. अजितदादा पवारसाहेब यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

| सचिव | अध्यक्ष | खजिनदार |
|---|---|---|
| मा. श्री. जवाहर मोतीलाल शहा (वाघोलीकर) | मा. श्री. अरहतदास हिराचंद शहा (सराफ) | मा. श्री. सुनील शिवलाल शहा (लेंगरेकर) |

| | | | |
|---|---|---|---|
| मा. श्री. राजकुमार तुळजाराम शहा (वाघोलीकर) | मा. श्री. सुभाष माणिकलाल शाह (वाघोलीकर) | मा. श्री. चकोर नलिनचंद्र गांधी | मा. श्री. मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर) |
| मा. श्री. विकास शशिकांत शहा (लेंगरेकर) | मा. श्री. चंद्रवदन विद्याचंद्र शहा (मुंबईकर) | मा. डॉ. श्री. सुभाष बाबूराव अडदंडे | मा. श्री. पद्माकर पायगोंडा पाटील |
| मा. डॉ. श्री. महावीर रायाप्पा अकोळे | मा. डॉ. श्री. धवलकुमार शामगोंडा पाटील | मा. श्री. अशोक सुरेंद्र शिरगुप्पे | मा. श्री. जिनेश्वर भाऊ दत्तवाडे |

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय कला, विज्ञान, वाणिज्य, बारामती

## अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बारामती

## अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूल, बारामती

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

# टी.सी.कॉलेजमध्ये फोटोग्राफी, कथ्थक सर्टिफिकेट अभ्यासक्रम सुरू

**बारामती:-** अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय पारंपारिक शिक्षणा सोबतच नवनवीन व्यावसायिक व्यासपीठे खुले करणाऱ्या अभ्यासक्रमांचे हब होत आहे. यंदाच्या वर्षी महाविद्यालयात बारामतीकरांसाठी अत्यंत नवीन अशा सर्टिफिकेट कोर्स इन फोटोग्राफी आणि सर्टिफिकेट कोर्स इन कथ्थक या दोन व्यावसायिक अभ्यासक्रमांची सुरूवात करण्यात आली आहे अशी माहिती प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी दिली.

पारंपारिक शिक्षणासोबतच हल्लीच्या युगात विद्यार्थ्यांनी कौशल्यपूर्ण असणे अत्यंत गरजेचे आहे. अशाच कौशल्य विकास उद्देशाने महाविद्यालयात या दोन नवीन व्यावसायिवक अभ्यासक्रमाची सुरूवात महाविद्यालयात केली आहे. केवळ विद्यार्थीचं नाही तर कुणीही विद्यार्थी व्यावसायिक, नोकरदार, गृहिणी अशा वेगवेगळ्या स्तरातील व्यक्ती या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकतात. शिवाय काळाच्या ओघात शिकायची आवड होती, परंतू शिकणे राहून गेले अशा व्यक्तींना देखील हा अभ्यासक्रम, त्यांची राहिलेली स्वप्ने नव्याने जागृत करणारा आहे, असे मत डॉ.मुरूमकर यांनी व्यक्त केले आहे.

छायाचित्र आणि कथ्थक अभ्यासक्रम हे तीन महिन्यांचे सर्टिफिकेट कोर्सेस आहेत. आठवड्यातून दर शुक्रवार आणि शनिवार संध्याकाळी हे कोर्सेस होणार आहेत. विद्यार्थ्यांसोबतच नोकरदार, इतर महाविद्यालयातील विद्यार्थी, व्यापारी, गृहिणी यांना अत्यंत सोयीच्या दृष्टिकोनातून वेळेची निश्चिती केली आहे.

यावर्षी या दोन अभ्यासक्रमांची सुरुवात महाविद्यालयात झाल्याने पुन्हा एकदा वेगळ्या धाटणीच्या अभ्यासक्रमांची मांडणी करणारे महाविद्यालय म्हणून तु.च. महाविद्यालयाची ओळख सार्थ ठरल्याचेही प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांनी सांगितले. या अभ्यासक्रमाबाबत प्रा.भिमराव तोरणे (मो.९८५०७९ २१६५)' यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

पान नं. १४

# तु. च. महाविद्यालय व मेडली बुर्ग यांच्यात सामंजस्य करार

बारामती - तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती व मेडली बुर्ग, पुणे यांच्यात नुकताच परकीय भाषा शिक्षणासंदर्भात सामंजस्य करार झाला. त्यानुसार दि. २९ जुलै पासून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात सर्टिफिकेट कोर्स इन फ्रेंच व सर्टिफिकेट कोर्स इन जर्मन हे कोर्सेस सुरू करण्यात येणार आहेत. पारंपारिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांनी कालसुसंगत कला, कौशल्ये विकसित केली तरच भविष्यामध्ये त्यांना यशस्वीपणे स्वतःच्या पायावर उभे राहता येईल व त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील सेंटर फॉर फॉरीन लॅंगवेजेस स्टडीज मार्फत या वर्षीपासून फ्रेंच व जर्मन भाषेचे वर्ग सुरू करीत आहोत अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी दिली. लवकरच स्पॅनिश, चायनीज व जापनिज भाषांचे वर्गही सुरू होतील असे त्यांनी सांगितले. मेडली बुर्ग संस्थेच्या संचालिका श्रीमती तन्वी भट यांनी या सामंजस्य कराराबाबत आनंद व्यक्त केला व ग्रामीण भागातील युवकांना फ्रेंच व जर्मन शिकल्याने भविष्यात नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध होतील असा विश्वास व्यक्त केला.

सर्टिफिकेट कोर्स इन फ्रेंच व सर्टिफिकेट कोर्स इन जर्मन हे कोर्सेस दर शनिवार व रविवारी चालवले जातील. हे कोर्सेस सर्वांसाठी खुले असून त्यासाठी किमान १० वी पास अशी अट आहे. अशी माहिती कोर्सचे समन्वयक डॉ. शशांक माने यांनी दिली असून याकरीता प्रा. माने यांच्याशी मो. ९७६३८६५५५६ यावर संपर्क साधावा.

साप्ताहिक रणशिंग
दि. २७/७/२०१७

# तु.च.महाविद्यालयात फोटोग्राफी आणि कत्थक अभ्यासक्रम सुरू

बारामती - अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय म्हणजे पारंपारिक शिक्षणासोबतच नवनवीन व्यावसायिक व्यासपीठे खुले करणाऱ्या अभ्यासक्रमाचे हब आहे. यंदाच्या वर्षी महाविद्यालयात बारामतीकरांसाठी अत्यंत नवीन अशा दोन व्यावसायिक अभ्यासक्रमांची सुरूवात करण्यात येत आहे. ते म्हणजे सर्टिफिकेट कोर्स इन फोटोग्राफी आणि सर्टिफिकेट कोर्स इन कत्थक. पारंपारिक शिक्षणासोबतच हल्लीच्या युगात विद्यार्थ्यांनी कौशल्यपूर्ण असणे अत्यंत गरजेचे आहे. अशाच कौशल्य विकास उद्देशाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी या दोन नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची सुरूवात महाविद्यालयात केली आहे. केवळ विद्यार्थीच नाही तर कुणीही विद्यार्थी व्यावसायिक, नोकरदार, गृहिणी अशा वेगवेगळ्या स्तरातील व्यक्ती या अभ्यासक्रमांना प्रवेश घेवू शकतात. शिवाय काळाच्या ओघात शिकायची आवड होती. परंतु शिकणे राहून गेले अशा व्यक्तींना देखील हा अभ्यासक्रम, त्यांची राहिलेली स्वप्ने नव्याने जागृत करणारा आहे.

छायाचित्र आणि कत्थक अभ्यासक्रम हे तीन महिन्यांचे सर्टिफिकेट कोर्सेस आहेत. आठवड्यातून दर शुक्रवार आणि शनिवार संध्याकाळी या कोर्सेसचे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांसोबतच नोकरदार, इतर महाविद्यालयातील विद्यार्थी, व्यापारी, गृहिणी यांना अत्यंत सोयीच्या दृष्टीकोनातून वेळेची निश्चिती केली गेली. यावर्षी या दोन अभ्यासक्रमांची सुरूवात महाविद्यालयात झाल्याने पुन्हा एकदा वेगळ्या धाटणीच्या अभ्यासक्रमांची मांडणी करणारे महाविद्यालय म्हणून टी.सी. महाविद्यालयाची ओळख साथ ठरल्याचे मत प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी व्यक्त केले. या अभ्यासक्रमाकरीता प्रा. भिमराव तोरणे मो.९८५०७९२१६५ यांचेशी संपर्क साधावा.

Tuljaram Chaturchand College Library • Baramati •

मा. प्राचार्य साहेब

दै. पुढारी दि. ३०/०१/२०२० पान ४

# टी. सी. महाविद्यालयात व्यावसायिक प्रशिक्षण

**बारामती : प्रतिनिधी**

बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात यंदापासून 'सर्टिफिकेट कोर्स इन फोटोग्राफी' आणि 'सर्टिफिकेट कोर्स इन कथ्थक' हे दोन अभ्यासक्रम सुरू करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी दिली.

विद्यार्थ्यांनी कौशल्यपूर्ण असणे अत्यंत गरजेचे आहे; त्यामुळे कौशल्य विकासाच्या उद्देशाने हे अभ्यासक्रम सुरू करण्यात आल्याचे डॉ. मुरुमकर म्हणाले. केवळ विद्यार्थीच नाही; तर कुणीही विद्यार्थी व्यावसायिक, नोकरदार, गृहिणी अशा वेगवेगळ्या स्तरांतील व्यक्ती या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकतात. शिवाय शिकायची आवड होती; परंतु काळाच्या ओघात शिकणे राहून गेले, अशा व्यक्तींनादेखील हा अभ्यासक्रम, त्यांची राहिलेली स्वप्ने नव्याने जागृत करणारा आहे. छायाचित्र आणि कथक अभ्यासक्रम हे तीन महिन्यांचे सर्टिफिकेट कोर्सेस आहेत, आठवड्यातून दर शुक्रवार आणि शनिवारी संध्याकाळी या कोर्सेसचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसोबतच नोकरदार, व्यापारी, गृहिणी यांना अत्यंत सोयीच्या दृष्टीकोनातून वेळेची निश्चिती करण्यात आली आहे. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी महाविद्यालयात प्रा. भीमराव तोरणे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुढारी ३०/०१/२० पान ४

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

मा. प्राचार्य साहेब

पुणे जिल्हा दक्षिण ११ पुढारी | पुणे, शुक्रवार ११ ऑगस्ट २०१७

# टी.सी. महाविद्यालयात व्होकेशनल सेंटर

## शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन

**बारामती : प्रतिनिधी**

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील व्होकेशनल सेंटरचे सोमवार (दि. १४) उद्घाटन होणार आहे. माजी केंद्रीय कृषिमंत्री खा. शरद पवार यांच्या हस्ते व प्रसिद्ध निर्माते-दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली हा उद्घाटन समारंभ पार पडेल. याबाबत अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अरहतदास शहा, सचिव जवाहर शहा, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी माहिती दिली.

या कार्यक्रमाला माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगपती अरविंद दोशी, विठ्ठल मणियार, जिल्हा परिषद अध्यक्ष विश्वास देवकाते, नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे आदी उपस्थित राहणार आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या सहयोगाने व अनुदानातून आणि सावित्रीबाई फुले



महाविद्यालयाने उभारलेले व्होकेशनल सेंटर

पुणे विद्यापीठाच्या मान्यतेने या महाविद्यालयात सन २०१४-१५ पासून स्वतंत्रपणे बॅचलर ऑफ व्होकेशनल सुरू करण्यात आले आहे. फूड प्रोसेसिंग अँड पोस्ट हार्वेस्ट टेक्नोलॉजी आणि जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन हे दोन पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या टेलिव्हिजन स्टुडिओ, ग्रीन क्रोमा, प्रॉडक्शन कंट्रोल रूम, थ्री कॅमेरा सेटअप, लाईट्स, टेलीप्रॉम्पटर, डबिंग स्टुडिओ, एडिटिंग केबिन्स (ध्वनीमुद्रण, संपादन, संकलन), स्क्रीनिंग रूम तसेच बी.व्होक. फूड प्रोसेसिंग अँड पोस्ट हार्वेस्ट टेक्नोलॉजी या अभ्यासक्रमासाठी आवश्यक अद्ययावत प्रयोगशाळा व नानाविध आधुनिक उपकरणे विद्यार्थी व संशोधकांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. या क्षेत्रातील देश-विदेशातील नामांकित उद्योग, शैक्षणिक व संशोधन संस्थांशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या बरोबरच व्होकेशनल सेंटरच्या माध्यमातून परदेशी भाषा केंद्र, भारतीय लिपी शास्त्र, कथ्थक नृत्य केंद्र, फोटोग्राफी, फाईन आर्ट्स इ. अनेक व्यवसायपूरक अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

या उद्घाटन समारंभासाठी बारामती व परिसरातील नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

12.8.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

पुण्य नगरी ▮ सोमवार, १४ ऑगस्ट २०१७ ▮ पुणे 3

# 'टीसी'त व्होकेशनल सेंटर

## आज उद्घाटन : शरद पवार, जब्बार पटेल यांची उपस्थिती

▮ बारामती : प्रतिनिधी

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये उभारण्यात आलेल्या व्यावसायिक अभ्यास केंद्राचे (व्होकेशनल सेंटर) उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्या हस्ते आणि प्रसिद्ध दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. १४ ऑगस्ट) होणार असल्याची माहिती अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अरहंतदास शहा, सचिव जवाहर वाघोलीकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

समारंभास माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योजक अरविंद जोशी, विठ्ठल मणियार, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विश्वासराव देवकाते, नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे आदी उपस्थित राहणार आहेत.

### देश-विदेशातील संस्थांशी करार

अभ्यासक्रमासाठी आवश्यक अद्ययावत प्रयोगशाळा व नानाविध आधुनिक उपकरणे विद्यार्थी व संशोधकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. या क्षेत्रातील देश-विदेशातील नामांकित उद्योग, शैक्षणिक व संशोधन संस्थांशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या बरोबरच व्होकेशनल सेंटरच्या माध्यमातून परदेशी भाषा केंद्र, भारतीय लिपी शास्त्र, कथ्थक नृत्य केंद्र, फोटोग्राफी, फाईन आर्टस् इ. अनेक व्यवसायपूरक अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. या अभ्यासक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्या सहयोगाने व अनुदानातून आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ यांच्या मान्यतेने महाविद्यालयात सन २०१४-१५ पासून स्वतंत्रपणे बॅचलर ऑफ व्होकेशनल अर्थात बी.व्होक.फूड प्रोसेसिंग ॲण्ड पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी आणि जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन हे दोन पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिली आहे. दरम्यान दि. १४ रोजी होणाऱ्या उद्घाटन समारंभास नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेस मिलिंद शहा, विकास लेंगरेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा आदी उपस्थित होते.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

साप्ताहिक कऱ्हा वार्ता Weekly Karhawarta पान ५ मंगळवार दि.१५ ऑगस्ट २०१७

# तु.च.महाविद्यालयातील व्होकेशनल सेंटरचे उद्घाटन

बारामती:- येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील व्होकेशनल सेंटरचे आज उद्घाटन होणार आहे. माजी केंद्रीय कृषिमंत्री खा.शरद पवार यांच्या हस्ते व प्रसिद्ध निर्माते-दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली हा उद्घाटन समारंभ पार पडेल. याबाबत अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अरहतदार शहा, सचिव जवाहर शहा, प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी माहिती दिली.

या कार्यक्रमाला माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उद्योगपती अरविंद दोशी, विठ्ठल मणियार, जिल्हा परिषद अध्यक्ष विश्वास देवकाते, नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे आदी उपस्थित राहणार आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या सहयोगाने व अनुदानातून आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यतेने या महाविद्यालयात सन २०१४-२०१५ पासून स्वतंत्रपणे बॅचलर ऑफ व्होकेशनल सुरू करण्यात आले आहे. फूड प्रोसेसिंग अँड पोस्ट हार्वेस्ट टेक्नोलॉजी आणि जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन हे दोन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत.

जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या टेलिव्हिजन स्टुडिओ, ग्रीन, क्रेमा, प्रॉडक्शन कंट्रोल रूम, थ्री कॅमेरा सेटअप, लाईट्स, टेलिप्रॉम्पटर, डबिंग स्टुडिओ, एडिटिंग केबिन्स (ध्वनीमुद्रण, संपादन, संकलन),



स्क्रीनिंग रूम तसेच बी.व्होक. फूड प्रोसेसिंग अँड पोस्ट हार्वेस्ट टेक्नोलॉजी या अभ्यासक्रमासाठी आवश्यक अद्ययावत प्रयोगशाळा व नानाविध आधुनिक उपकरणे विद्यार्थी व संशोधकांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. या क्षेत्रातील व संशोधन संस्थांशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. याबरोबरच व्होकशनल सेंटरच्या माध्यमातून परदेशी भाषा केंद्र, भारतीय लिपी शास्त्र, कथ्थक नृत्य केंद्र, फोटाग्राफी, फाईन आर्ट्स इ. अनेक व्यवसायपूरक अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत.

या उद्घाटन समारंभासाठी बारामती व परिसरातील नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

दुर्गा
Screen 1
शाहरुख खान, अ
सिंग, पारस अरोरा
दु.३.१५ वाजता
सचिन खेडेकर, सोना
सायं. ६.१५ वा.
गश्मीर मह
Screen 2
अक्षय कुमार, भूमी
राजेश शर्मा, दिवे

Library Baramati

पुढारी १३/८/१० २

## प्रा. सुरेश इंगवले

बारामती : येथील निवृत्त प्रा. सुरेश बळवंतराव इंगवले (वय ६८) यांचे नुकतेच निधन झाले. ते तुळजाराम



चतुरचंद महाविद्यालयाचे माजी शारीरिक शिक्षण संचालक होते. उत्कृष्ट खो-खोपटू असलेल्या प्रा. इंगवले यांनी ३१ वर्षे महाविद्यालयात सेवा केली. या काळात बारामती परिसरात अनेक नामवंत खेळाडू त्यांनी घडविले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. पुढारी १३/८/१० २

लोकमत दि १४/८/१०

## सुरेश इंगवले

बारामती : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे माजी शारीरिक



शिक्षण संचालक सुरेश बळवंतराव इंगवले (वय ६८) यांचे निधन झाले. सुमारे एकतीस वर्षे त्यांनी महाविद्यालयात अनेक क्रीडापटूंना मार्गदर्शन करून घडविले. त्यांच्या मागे पत्नी, तीन विवाहित मुली व विवाहित मुलगा असा परिवार आहे. लोकमत १४/८/१० मंथन

सकाळ १४/८/१० पान ६



## सुरेश इंगवले

बारामती, ता. १३ : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे माजी शारीरिक शिक्षण संचालक सुरेश बळवंतराव इंगवले (वय ६८) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. सुमारे ३१ वर्षे त्यांनी महाविद्यालयात अनेक क्रीडापटूंना मार्गदर्शन करीत घडविले होते. सकाळ १४/८/१० ६

प्रभात दि १४/८/१० पान ५

## सुरेश इंगवले

बारामती, दि. १३ - येथील



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे माजी शारीरिक शिक्षण संचालक सुरेश बळवंतराव इंगवले यांचे नुकतेच निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, तीन विवाहित मुली व एक विवाहित मुलगा असा परिवार आहे. प्रभात १४/८/१० ५

मा. प्राचार्य साहेब

साप्ताहिक रणशिंग दि. 23/11/2017 पान नं. 15

# तु.च. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

बारामती - दि. १६ व १७ ऑक्टोबर रोजी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर झालेल्या आंतर विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत अ.नगर, नाशिक व पुणे शहर संघाचा पराभव करून पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या संघाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अविराज गायकवाड व राजवैभव बांगर यांची आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघात निवड झालेली आहे. तसेच लासलगांव, जि. नाशिक येथे झालेल्या आंतर विभागीय बेसबॉल मुले स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या श्रीकांत सपकळ यांची आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघात निवड झालेली आहे.

या खेळाडूंना तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव व प्रा. अशोक देवकर यांनी प्रशिक्षण दिले.

या यशाबद्दल महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेळवे, डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

साप्ताहिक लोकवार्ता दि. 23/11/2017 पान नं. 2

# विद्यापीठाच्या तु.च. महाविद्यालयात अधिसभा निवडणुकीसाठी मतदान



**बारामती:–** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीसाठी बारामती येथील तु.चं. महाविद्यालयात शांततेत मतदान पार पडले.

पदवीधर मतदारांनी रविवार (दि.१९) रोजी सकाळ पासूनच मतदान करण्यासाठी गर्दी केली होती. पदवीधरच्या खुल्या गटातील ५ जागांसाठी १९ उमेदवार रिंगणात होते.

महिला प्रवर्गाच्या एका जागेसाठी ३ उमेदवार, अनुसूचित जाती प्रवर्गाच्या एका जागेसाठी ६ उमेदवार, अनुसूचित जमातीच्या एका जागेसाठी २ उमेदवार तर एनटी प्रवर्गाच्या जागेसाठी ५ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते.

बारामती तालुक्यातील अनेक पदवीधर मतदारांनी तु.च. महाविद्यालयात आपला मतदानाचा हक्क बजावला. प्रगती पॅनेल व विद्यापीठ विकास पॅनेल यांच्यात प्रमुख लढत झाली.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

माननीय प्राचार्य साहेब,

साप्ताहिक कऱ्हा वार्ता बुधवार दि.१८ ऑक्टोबर २०१७ पान नं.२

# तु.च.महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेत १०८ शोधनिबंध सादर

बारामती:- येथील अनेकान्त एज्युकेशैन सोसायटीच्या अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेध्ये १०८ शोधनिबंध सादर करण्यात आले.

स्किल कनव्हर्जन्स:ए मॅनेजमेंट पाथ फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयावर दोन दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली होती. आयएसएमटीचे उपाध्यक्ष किशोर भापकर यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. संस्थेचे सचिव जवाहर शहा अध्यक्षस्थानी होते. यावेळी जिल्हा कौशल्य विकासच्या संचालिका अनुपमा पवरा उपस्थित होत्या. यावेळी मॅनेजमेंट स्टडीजचे सचिव मिलिंद शहा, सहसचिव विकास शहा, संचालक डॉ.एस.ए. लाहोरी, डॉ.एम.जी.देवमाने, रजिस्ट्रार ए.बी.शहा, परिषदेचे समन्वयक डॉ.डी.पी.मोरे यांच्यासह देश-. विदेशातील प्राध्यापक, संशोधक, उद्योगतज्ञ व विद्यार्थी सहभागी होते.

भापकर यांनी यावेळी कौशल्य विकास अवगत करण्याचे महत्त्व व फायदे विशद केले. मोठे होण्याची स्वप्ने बघा, असा सल्ला त्यांनी दिला. अनुपमा पवार यांनी कौशल्य विकास ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

स्काईपच्या माध्यमातून यावेळी व्हिडीओ कॉलद्वारे मूळ बारामतीचे असलेल्या व अमेरिकेत शिक्षण घेत असलेल्या ऐश्वर्या कोठारी हिने स्किल कन्व्हर्जनबद्दल मत व्यक्त केले. डॉ.एम.जी.देवमाने, डॉ.ए.एम.लाहोरी, डॉ.आर.जी.पवार, डॉ.राजेंद्रसिंग परदेशी, डॉ.वासुदेव बर्वे, डॉ.गिते यांनी आपली मनोगते व्यक्त केली. चर्चासत्रात डॉ.रूपेंद्र गायकवाड, डॉ.परदेशी, गिते, पद्मिनी चव्हाण, डॉ.कर्नल मलिक, जर्मनीचे सायमन झुक, महेश जाधव, माधुरी लेले आदींनी सहभाग घेतला.

समारोपप्रसंगी अनेकान्तचे अध्यक्ष अरहतदास शहा, डॉ.एस.आर. कांदलगावकर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.उमेश कोळीमठ व डॉ.टी.व्ही. चव्हाण यांनी केले. डॉ.ए.वाय. दीक्षित यांनी आभार मानले.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

A3S
23/10

मा. प्राचार्यसाहेब

साप्ताहिक रणशिंग दि. १६/११/२०१७ पान नं. १४

# तु. च. महाविद्यालयाचे विविध क्रीडा स्पर्धेमध्ये यश

बारामती - क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित शालेय १९ वर्षे वयोगट मुले व मुलींनी विविध क्रीडा स्पर्धेत उल्लेखनिय यश संपादन केले.

बुलढाणा येथे झालेल्या शालेय राज्यस्तर कराटे स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ठ खेळांचे प्रदर्शन करीत यश मिळविले. यामध्ये अनुराग देशमुख प्रथम क्रमांक, ओंकार झगडे द्वितीय क्रमांक प्राप्त केला. अनुराग देशमुख या खेळाडूंची शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झालेली आहे.

सोलापूर येथे झालेल्या पुणे विभागीय शालेय डॉजबॉल स्पर्धेतून महाविद्यालयाच्या गौरव दिवसे व सौरभ मुळीक या खेळाडूची शालेय राज्यस्तर स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. औरंगाबाद येथे झालेल्या राज्यस्तर स्पर्धेत केलेल्या उल्लेखनीय कामगिरी मुळे गौरव दिवसे व सौरभ मुळीक या दोन खेळाडूची शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्यां संघात निवड झालेली आहे.

महाराष्ट्र नेटबॉल असोसिएशनने सांगली येथे आयोजित केलेल्या ज्युनिअर राज्यस्तर नेटबॉल स्पर्धेसाठी अभिषेक तावरे व शरयु जगताप या दोन खेळाडूंची पुणे जिल्हा संघात निवड करण्यात आली होती. या स्पर्धेत मुलांच्या संघाने राज्यस्तर स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला.

महाराष्ट्र टेनिकॉईट महासंघाच्या वतीने नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या ४२ व्या सिनिअर राज्यस्तर टेनिकॉईट स्पर्धेत महाविद्यालयाच्या गौरी गावडे, पुजा गावडे व स्वाती सुरवसे या खेळाडूंनी उल्लेखनीय खेळाचे प्रदर्शन करीत राज्यस्तरावर तृतीय क्रमांक प्राप्त केला. या खेळाडूंना तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव व प्रा. अशोक देवकर यांनी प्रशिक्षण दिले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेळवे, डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा, सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ निवडणूक विभाग

साप्ताहिक कऱ्हावार्ता दि. १३/११/२०१७ पान नं. ३

# क्रीडा स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे यश

**बारामती:-** क्रीडा व युवक संचालनालय व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या वतीने आयोजित क्रीडा स्पर्धेत येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने घवघवीत यश मिळविले.

बुलढाणा येथे झालेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात अनुराग देशमुख याने प्रथम तर ओंकार झगडे याने द्वितीय क्रमांक मिळविला. अनुराग देशमुख याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्याच्या संघात निवड झाली.

सोलापूर येथे झालेल्या पुणे विभागीय शालेय डॉजबॉल स्पर्धेतून महाविद्यालयाच्या गौरव दिवसे व सौरभ मुळीक यांची राज्यस्तर स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. औरंगबाद येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेतून पुढे या दोघांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्याच्या संघात निवड झाली आहे. महाराष्ट्र नेटबॉल असोसिएशनने सांगली येथे आयोजित केलेल्या ज्युनियर राज्यस्तर नेटबॉल स्पर्धेसाठी अभिषेक तावरे व शरयू जगताप या दोन खेळाडूंची पुणे जिल्हा संघात निवड करण्यात आली होती. या स्पर्धेत मुलांच्या संघाने राज्यस्तरावर तृतीय क्रमांक मिळविला.

महाराष्ट्र टेनिकॉईट महासंघाच्या वतीने नागपूर येथे आयोजित करण्याल आलेल्या ४२ व्या सीनीयर राज्यस्तर टेनिकॉईट स्पर्धेत महाविद्यालयाच्या गौरी गावडे, पूजा गावडे व स्वाती सुरवसे या खेळाडूंनी राज्यस्तरावर तृतीय क्रमांक मिळविला. या खेळाडूं शारीरिक शिक्षण संचालक प्रा.गौतम जाधव व प्रा.अशोक दवेकर यांनी प्रशिक्षण दिले. प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य डॉ.शिवाजी साठे, डॉ.अविनाश जगताप, डॉ.अजित तेळवे, डॉ.सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

M88 2/18/11

मा. प्राचार्य साहेब

दै. पुढारी दि. ०५/१२/२०१७ पान ५

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात गुरुवारपासून आंतरराष्ट्रीय परिषद

**बारामती : प्रतिनिधी**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये भौतिकशास्त्र विभागातर्फे गुरुवारपासून (दि. ७) शनिवारपर्यंत (दि. ९) 'अप्लाइड नॅनोटेक्नॉलॉजी व नॅनोसायन्स' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. 'नॅनो मोलीक्युलर सोसायटी', नवी दिल्ली, तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

जागतिक कीर्तीचे संशोधक, भारतातील विविध संशोधन संस्था आणि विद्यापीठामध्ये संशोधन करणारे २५० हून अधिक वैज्ञानिक व अभ्यासक या परिषदेमध्ये सहभागी होत आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी दिली. या परिषदेमध्ये जवळपास १५० संशोधन पत्रिकांचे वाचन होणार आहे.

परिषदेचे उद्घाटन गुरुवारी (दि. ७) सकाळी १० वाजता हरियाणा येथील कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. सिंग यांच्या हस्ते होत आहे. नॅनो ॲण्ड मोलीक्युलर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. एस. गौर हे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य मिलिंद शाह भूषविणार आहेत. परिषदेमध्ये ज्येष्ठ वैज्ञानिक, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे माजी प्रमुख आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बंगळूर येथील एमिरिट्स प्रा. ई. एस. राजगोपाल हे विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

या परिषदेचा समारोप स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू व ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते व नॅनो ॲण्ड मोलीक्युलर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. एस. गौर यांच्या प्रमुख उपस्थितीत, तसेच मिलिंद शाह यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि. ९) होईल.

या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. एम. के. कोकरे हे समन्वयक, डॉ. आर. टी. सपकाळ सहसमन्वयक व डॉ. अशोक काळंगे हे संयोजन सचिव म्हणून काम पाहत आहेत. भौतिकशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व विविध समित्यांतील सदस्य व पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रयत्नशील आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. मुरुमकर यांनी दिली. पुढारी ५/१२/१७

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दै. लोकमत दि. ०५/१२/२०१७ पान : ८

# 'अनेकांत आविष्कार' महोत्सवानिमित्त विविध स्पर्धा

बारामती : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'अनेकांत आविष्कार' महोत्सवानिमित्त विविध स्पर्धा पार पडल्या. महोत्सवाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, कल्पक विचारांना वाव देण्यासाठी 'स्मार्ट युथ स्मार्ट इंडिया' या कल्पनेवर आधारित उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा, निबंध, चित्रकला, रांगोळी, हस्ताक्षर, प्रश्नमंजूषा, स्वाक्षरी, पाककला, पुष्परचना आदी स्पर्धांचे आयोजन या वेळी करण्यात आले होते.

या वेळी बेकरी विभागातील विद्यार्थ्यांनी स्वतंत्रपणे खमंग व चवीष्ट पदार्थांची उभी केलेली खाऊगल्ली खवय्यांचे आकर्षण ठरले. या वेळी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रदर्शित करणारा विविध गुणदर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. या सर्व उपक्रमांत सुमारे ४५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या उपक्रमात अनेकांत आविष्कार समितीप्रमुख प्रा. सचिन सोन्रा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या वैशाली माळी, समन्वयक प्रा. राजेंद्र आगवणे, प्रा. गोरखनाथ मोरे यांच्यासह शिक्षकांनी सहभाग घेतला. लोकमत ८ ५/१२/१७

ATS 6/12/17

सा. रणशिंग



# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात कोजागिरी काव्यमैफिलीची दशकपूर्ती

बारामती - तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेनिमित्त काव्यमैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. काव्यमैफिलीचे हे १० वे वर्ष असून महाविद्यालयात हा उपक्रम प्रतिवर्षी साजरा केला जातो. निसर्ग, शेतकरी, पाऊस, भटकंती, शिक्षण, कॉलेजजीवन, जीवनातील आदर्श, वार्धक्य इ. तसेच कोजागिरी पौर्णिमेचे वर्णन करणाऱ्या कविता सादर केल्या गेल्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर होते. याप्रसंगी रितेश साळवे या विद्यार्थ्याने-

मी आता हल्ली पावसासंगे
अनामिक वाहतो
तुझी आठवण येता
फक्त...त्या छत्रीकडे पाहतो

ही स्वरचित कविता सादर केली. तर शुभम काकडे या विद्यार्थ्याने ज्येष्ठांची साठी या कवितेतून-

साठीच्या घरात होतो-
पाय होते थकलेले
चेहऱ्यावरती सुरकुत्या-
केस होते पिकलेले
प्रेयसी माझी खाट-
आधाराला काठी होती
कारण ती -
आयुष्याची साठी होती.

वार्धक्य जीवनाकडे लक्ष वेधले. प्रा. प्रमोद वडगावकर यांनी जोरात चाले राजकारण या कवितेतून सध्याचे राजकारण, सामाजिक वास्तव व बुवाबाजी या विषयावरील खालील मार्मिक कविता सादर केली.

बुवा बाबा माताजींचे
कैक असती रंग इथे
दिवसाढवळ्या दर्शने देती
रंगेल रंगेल रातीचे

तर मराठी विभाग प्रमुख डॉ. रंजना नेमाडे यांनी-

मित्र होवून मित्रच राहू
खांद्यावरती हात ठेवू
श्वासासोबत चालत राहू
कुठलीही भेट शेवटची करून घेऊ

तू सिंगल....मी सिंगल ही संजय चौधरी यांची कविता सादर करून उपस्थितांची उत्स्फूर्त दाद घेतली तर विंदा करंदीकरांची झपताल ही कविता डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी सादर केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी काही आशयगर्भ कविता सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

काळी माती हिरवे झाड
का झोपलाय तो इतका गाढ

ही कष्टकरी शेतकऱ्याला करणारी कविता सादर केली. तसेच चेहऱ्यावरील बेफिकिरी अशी झटकता येईल ? असे शिक्षणातील अनास्थेव प्रवृत्तींवर बोट ठेवले.

महाविद्यालयातील कु. समीर शहा, कु. स्वाती कद्दू, कु. गिरिजा महामुनी, रितेश साळवे, शुभम काकडे, सुशांत काळे, गणेश परकाळे या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी वैविध्यपूर्ण कवितांचे सादरीकरण केले तर प्रा.शुभम देवकाते, प्रा. सुहास राऊत, डॉ. प्रतिभा जावळे, प्रा. मुक्ता आंभेरे, प्रा. विनायक लष्कर, प्रा. जय राणे, प्रा. प्रमोद वडगावकर, प्रा. राजेंद्र आगवणे यांनी विविध विषयांवर कविता सादर केल्या. काव्य मैफिलीचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. रंजना नेमाडे यांनी केले. डॉ. सीमा नाईक-गोसावी, डॉ. संदीप तापकीर, डॉ. सुनील खामगळ यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी आभार मानले. सर्वांनी कावयमैफिलीस उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

1

2017

सा. रणशिंग दि. १९/१०/२०१७ पान २६

# तु.च. महाविद्यालयाचे विविध क्रीडा स्पर्धेत यश

बारामती - क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित शालेय १९ वर्षे वयोगट मुले व मुलींनी विविध क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. तळेगांव दाभाडे येथे झालेल्या जिल्हास्तर नेटबॉल मुले व मुली स्पर्धेत महाविद्यालंयाच्या संघास उपविजेतेपद मिळाले. या संघातील प्रणव पोमणे, अभिषेक तावरे, दिग्वीजय आटोळे, आर्यन जाधव, गौरव दिवसे व स्वाती सुरवसे या खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

जिल्हा क्री. को तंकुल बारामती येथे झालेल्या जिल्हास्तर कराटे स्पर्धेत ऋषिकेश डेंगळे, अनुराग देशमुख, अभिषेक जवळेकर व ओंकार झगडे यांनी प्रथम क्रमांक प्रास केला आहे. या खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. जिल्हास्तर फ्रिस्टाईल कुस्ती स्पर्धेत मुलांच्या गटात अभिषेक देवकाते (९३ किलो वजनगट) प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.जिल्हास्तर बॉक्सिंग स्पर्धेत मुलांच्या गटात विलास जाधव (४४ ते ४६ किलो वजनगट) प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. जिल्हास्तर मैदानी स्पर्धा नुकत्याच बालेवाडी पुणे या ठिकाणी संपन्न झाल्या. या स्पर्धेत मुलांच्या गटात राहुल केसकर, नितीन केसकर यांनी ५ कि.मी. चालणे स्पर्धेत अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक प्रास केला. अभिजित बोडरे क्रॉसकंट्री स्पर्धेत द्वितीय क्रमांक, पूजा गावडे १०० मी धावणे द्वितीय क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. जिल्हास्तर शुटींग स्पर्धेत लोहिताक्ष बनछोड याने प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. वरील खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# तु.च. महाविद्यालयाचे बास्केटबॉल स्पर्धेमध्ये सुयश

बारामती - आर्मी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिघी व पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या अंतर्गत मुलींच्या आंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत टी.सी. महाविद्यालयाच्या संघाने प्रतिभा महाविद्यालय चिंचवड, ढोलेपाटील महाविद्यालय, वाघोली व एम.आय.टी. महाविद्यालय, आळंदी या संघाचा पराभव करत तिसरे स्थान मिळविले. निकीता गायकवाड, पूजा तावरे, शिवानी डोंबाळे, आकांक्षा डोंगरे, दृष्टी चव्हाण व अनुराधा भोसले यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

या स्पर्धेतून पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या संघाची निवड करण्यात आली. या संघात टी.सी. महाविद्यालयाच्या निकीता गायकवाड व शिवानी डोंबाळे यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धा दि. १४ व १५ ऑक्टोंबर रोजी मॉडर्न महाविद्यालय, पुणे येथे होणार आहे.या खेळाडूंना टी.सी. महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव व अशोक देवकर यांनी प्रशिक्षण दिले. या कामगिरीबद्दल टी.सी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी सर्व खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे विविध क्रीडा स्पर्धेत यश

बारामती : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित शालेय १९ वर्षेवयोगट मुले व मुलींनी विविध क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले.

तळेगाव दाभाडे येथे झालेल्या जिल्हास्तर नेटबॉल मुले व मुली स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघास उपविजेतेपद मिळाले. या संघातील प्रणव पोमणे, अभिषेक तावरे, दिग्वीजय आटोळे, आर्यन जाधव, गौरव दिवसे व स्वाती सुरवसे या खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

जिल्हा क्रीडा संकुल बारामती येथे झालेल्या जिल्हास्तर कराटे स्पर्धेत ऋषिकेश डेंगळे, अनुराग देशमुख, अभिषेक जवळेकर व ओंकार झगडे यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला या खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

जिल्हास्तर फ्रिस्टाईल कुस्ती स्पर्धेत मुलांच्या गटात अभिषेक देवकाते (९३ किलो वजनगट) प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

(पान नं. ४ वर...

पान ४

साप्ताहिक आक्रोश बारामती-फलटण गुरुवार, दि. १६.११.२०१७ ते २२.११.२०१७

# बास्केटबॉल स्पर्धेमध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे यश

**बारामती :** आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिघी व पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या अंतर्गत मुलींच्या आंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत टी.सी. महाविद्यालयाच्या संघाने प्रतिभा महाविद्यालय चिंचवड, ढोलेपाटील महाविद्यालय, वाघोली व एम.आय.टी. महाविद्यालय, आळंदी या संघाचा पराभव करत तिसरे स्थान मिळविले. निकीता गायकवाड, पूजा तावरे, शिवानी डोंबाळे, आकांक्षा डोंगरे, दृष्टी चव्हाण व अनुराधा भोसले यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

या स्पर्धेतून पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या संघाची निवड करण्यात आली या संघात टी.सी. महाविद्यालयाच्या निकीता गायकवाड व शिवानी डोंबाळे, यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धा दिनांक १४ व १५ ऑक्टोबर रोजी मॉडर्न महाविद्यालय, पुणे येथे होणार आहेत.

या खेळाडूंना टी.सी. महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा.गौतम जाधव व अशोक देवकर यांनी प्रशिक्षण दिले या कामगिरीबद्दल टी.सी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांनी सर्व खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

Tuljaram Chaturchand College Baramati Library

दै. केसरी दि ७/१२/१७ पान ३

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**बारामती, (वार्ताहर) :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये भौतिकशास्त्र विभागातर्फे दि. ७ ते ९ डिसेंबर दरम्यान 'अप्लाईड नॅनोटेक्नॉलॉजी व नॅनोसायन्स' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. नॅनो मोलीक्युलर सोसायटी, नवी दिल्ली तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी दिली.

जागतिक किर्तीचे संशोधक, भारतातील विविध संशोधन संस्था आणि विद्यापीठामध्ये संशोधन करणारे २५० हून अधिक वैज्ञानिक व अभ्यासक या परिषदेमध्ये सहभागी होत आहेत. या परिषदेमध्ये जवळपास १५० संशोधन पत्रिकांचे वाचन होणार आहे. विविध महाविद्यालयातील पदवी/पदव्युत्तर विभागातील संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी देखील या परिषदेत सहभागी होणार आहेत.

परिषदेचे उद्घाटन गुरुवार, दि. ७ डिसेंबर रोजी सकाळी हरियाणा येथील कृषी विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर डॉ. के. पी. सिंग यांचे हस्ते होत आहे. नॅनो अॅण्ड मोलीक्युलर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. एस. गौर हे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य मिलिंद शाह हे आहेत.

परिषदेमध्ये जेष्ठ वैज्ञानिक, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे माजी प्रमुख आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बेंगलोर येथील एमिरिटस प्रोफेसर ई. एस. राज गोपाल हे विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. या परिषदेचा समारोप स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू व जेष्ठ वैज्ञानिक डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते शनिवार दि. ९ डिसेंबर रोजी संपन्न होत आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. एम. के. कोकरे हे समन्वयक, डॉ. आर. टी. सपकाळ सहसमन्वयक व डॉ. अशोक काळंगे हे संयोजन सचिव म्हणून काम पाहत आहेत. अधिक माहितीसाठी डॉ. अशोक काळंगे यांच्याशी क्रमांक ९४२०४८००८० वर संपर्क साधावा.

केसरी दि. ७/१२/१७ पान ३

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दै. केसरी दि. ६/१२/१७ पान ३

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**बारामती, (वार्ताहर) :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये भौतिकशास्त्र विभागातर्फे दि. ७ ते ९ डिसेंबर दरम्यान 'अप्लाईड नॅनोटेक्नॉलॉजी व नॅनोसायन्स' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. नॅनो मोलीक्युलर सोसायटी, नवी दिल्ली तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी दिली.

जागतिक कीर्तीचे संशोधक, भारतातील विविध संशोधन संस्था आणि विद्यापीठामध्ये संशोधन करणारे २५० हून अधिक वैज्ञानिक व अभ्यासक या परिषदेमध्ये सहभागी होत आहेत. या परिषदेमध्ये जवळपास १५० संशोधन पत्रिकांचे वाचन होणार आहे. विविध महाविद्यालयातील पदवी/पदव्युत्तर विभागातील संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी देखील या परिषदेत सहभागी होणार आहेत.

परिषदेचे उद्घाटन गुरुवार, दि. ७ डिसेंबर रोजी सकाळी हरियाणा येथील कृषी विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर डॉ. के. पी. सिंग यांचे हस्ते होत आहे. नॅनो ॲण्ड मोलीक्युलर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. एस. गौर हे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य मिलिंद शाह हे आहेत.

परिषदेमध्ये जेष्ठ वैज्ञानिक, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे माजी प्रमुख आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बेंगलोर येथील एमिरिटस प्रोफेसर ई. एस. राज गोपाल हे विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. या परिषदेचा समारोप स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू व जेष्ठ वैज्ञानिक डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते शनिवार दि. ९ डिसेंबर रोजी संपन्न होत आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. एम. के. कोकरे हे समन्वयक, डॉ. आर. टी. सपकाळ सहसमन्वयक व डॉ. अशोक काळंगे हे संयोजन सचिव म्हणून काम पाहत आहेत. अधिक माहितीसाठी डॉ. अशोक काळंगे यांच्याशी क्रमांक ९४२०४८००८० वर संपर्क साधावा.

केसरी दि. ६/१२/१७ पान ३

Tuljaram Chaturchand College * Baramati * Library